झुंजार नेता

दिनांक : ३० जानेवारी २०२० • वार : गुरूवा

Shri Amolak Jain ... Mandal's ... LIBRARY

# विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास रासेयो शिबीरामधुनच होतो -विक्रम पोकळे

आष्टी,दि.२९(प्रतिनिधी): आष्टी तालुक्यातील वटणवाडी हे एक आदर्शगाव आहे. माजी सरपंच भगवानराव शिनगिरे यांनी या गावात विविध अभियान ,उपक्रम राबवुन ,आणि विविध स्पर्धेत सहभाग नोंदवुन आनेक बक्षीसेही पटकावलीत. त्यांचे चिरंजीव गांधी महाविद्यालयात जीएस आहे. किरण शिनगिरे यांनी आपले प्राचार्य व रासेयोचे कार्यक्रमाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करुन हे सात दिवसांचे शिबीर आणले. या शिबीरार्थींनी उत्कृष्टपणे काम करुन ग्रामस्थांचे मने जिंकले आहेत.



महाविद्यालयीन जीवनात समाजासमवेत राहुन कष्ट करण्याची आवड व आपल्या अंगात असलेले सुप्त कलागुणांना व्यक्त करुन ते छंद जोपासले पाहिजेत. याच वयात हे करता येत असते.विद्यार्थीचा व्यक्तीमत्व विकास रासेयो शिबीरामधुनच होतो असे प्रतिपादन बीड जि.प.चे. माजी शिक्षणाधिकारी विक्रमराव पोकळे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या जलसाक्षरता व जलसंवर्धनासाठी युवा हे सात दिवसांचे विशेष हिवाळी शिबीर झाले. या शिबीराच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक मूहणुन बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी हे होते. प्रमुख पाहुणे स्वामी विवेकानंद निवासी आश्रमशाळेचे अध्यक्ष भगवानराव शिनगिरे , उपप्राचार्य जवाहरलाल भंडारी , सरपंच छगनराव शिनगिरे ,देवशाला शिरोळे ,पत्रकार उत्तम बोडखे ,दादासाहेब बन, उपसरपंच दामोदर कोकाटे , विष्णु नरवडे , नवनाथ साबळे ,ह.भ.प.गोरख महाराज गायकवाड , मुख्याध्यापक सुवर्णा भोरे, मुख्याध्यापक मारुती शिनगिरे ,ईथापे मुकादम,लहु झरेकर हे होते.यावेळी प्रा.डा.नवनाथ विधाते यांनी प्रस्ताविक केले. स्वामी विवेकानंद निवासी आश्रमशाळेचे शिक्षक धस सर , प्रियंका जाधवर ,अंकीता जाधव ,अक्षय विधाते ,एनएसएस प्रतिनिधी प्रमोद कन्हेरकर , किरण शिनगिरे ,सौ.दैवशाला शिरोळे ,दादा बन यांचे भाषणे झाले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी म्हणाले की, पाण्याचा योग्य वापर प्रत्येकाने केला पाहिजे. पाण्याची बचत केली पाहिजे तरच पाणीटंचाईच्या संकटावर मात करता येईल. वृक्षारोपणाचे महत्त्व सांगून प्रत्येकाने एक तरी झाड लावले पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.नवनाथ विधाते यांनी केले. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी किरण भगवानराव शिनगिरे म्हणाले की , माझ्या प्रयत्नाने रासेयोचे सात दिवसाचे शिबीर वटणवाडी गावात गांधी महाविद्यालयाने दिले.शिबीरार्थींनी ग्रामस्वच्छता ,वृक्षलागवड ,समाजप्रबोधन आदि उत्तमप्रकारे काम केले. आमचे गावकरी भारावुन गेले. पुढीलवर्षीही वटणवाडीत शिबीर घातले जाईल असे किरण शिनगिरे यांनी सांगीतले.शिबीर यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य डा.जवाहरलाल भंडारी, प्रा.डॉ.अनारसे. डॉ.उध्दव चव्हाण. प्रा.सय्यद युनूस, प्रा.डा.राधाकृष्ण जोशी, मुकुंद बेल्हेकर ,हिरालाल लुनावत यांनी परिश्रम घेतले. सर्व प्राध्यापक व विद्यार्थी आणि शिक्षक्तेर कर्मचारी आणि वटणवाडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा.धनश्री मुनोत तर आभार डॉ. सुपर्णा देशमुख यांनी मानले.

# वटणवाडी येथे रासेयोचे शिबीरात बहरले कवी संमेलन

आष्टी , दि. २७ (प्रतिनिधी):-आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने वटणवाडी येथे कलेजंचा जीएस किरण भगवानराव शिनगिरे यांच्या पाठपुराव्याने वटणवाडी येथे रासेयोचे विशेष हिवाळी शिबीर होत आहे. या शिबीरात तालुक्यातील निमंत्रीत कवींचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वटणवाडी येथील सरपंच छगनराव शिनगीरे हे होते .

यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डा.नवनाथ विधाते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी श्रीरामपूर येथील कवी आंनदा साळवे यांच्या सासू व आत्याबाई तुम्ही दळूदळू हो मेल्या आमच्या काळामध्ये लाईटच्या गिरणी आल्या या कवितेने उपस्थितांची मने जिंकली. तर आष्टीचे युवराज वायभासे यांनी आपल्या दिवा या कवितेने उपस्थितांना भाऊक केले. कवयित्री सौ. संगीता होळकर यांच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कवितेने महाराजांचा इतिहास जिवंत केला. जेष्ठ कवि प्रा.नागेश शेलार यांनी आपल्या सर्वच कवितेतून सध्याचे राजकारण ,समाजकारण व प्रेमावर केलेल्या कवितांना प्रतिसाद मिळाला. शेलार यांनी कविसंमेलनाचे बहारदार सुत्रसंचलन करून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डा.नवनाथ विधाते यांनी आभार मानले. यावेळी माजी सरपंच तथा स्वामी विवेकानंद निवासी आश्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव शिनगिरे ,७ मुकूंद बेल्हेकर ,हिरालाल लूनावत, स्वत धान्य दुकानदार वायकर ,संजय कर्डिले, सरपंच छगनराव शिनगिरे ,उपसरपंच दामोदर कोकाटे, अर्जुन मैंद, किसन नरवडे आदि मान्यवर उपस्थित होते.



लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२०

## अंकिता जाधव काव्यवाचनमध्ये प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**बीड :** आष्टी तालुक्यातील कडा येथील श्रीमती एस.के.गांधी महाविद्यालय व शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्यच्या वतीने आयोजित महाविद्यालयीन काव्यवाचन स्पर्धेत अंकिता जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावला तर महेश दळवी, सरिता पोटे व रेश्मा शेकडे यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ बक्षीस मिळविले.

प्राचार्य डॉ. नंदिकशोर राठी, शब्दगंधचे भगवान राऊत, प्रा. डॉ. राधाकृष्ण जोशी, उपप्राचार्य जे.एम. भंडारी, बाळासाहेब शेंदूरकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुस्तके प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या स्पर्धेमध्ये २५ स्पर्धक सहभागी झाले होते. प्रा. डॉ. अनिल गर्जे व प्रा. सुनिता बोंबे यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

LIBRARY

दैनिक दिव्य मराठी
बीड, सोमवार, २ डिसेंबर २०१९

Shri Amolak Jain Vidya Prasarak Mandal's Smt. S.K. Gandhi Arts, Amolak Science & P.H. Gandhi Commerce College, Kada LIBRARY

# कडा येथे आजपासून सायबर सुरक्षेविषयक कार्यशाळा

प्रतिनिधी | कडा

कडा येथील गांधी महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी 'सायबर सुरक्षा आणि माहितीशास्त्र' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (ता.२ डिसेंबर) या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे.

कडा येथील श्रीमती झांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान व पन्नालाल गांधी वाणिज्य महाविद्यालयात मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकारच्या पंडीत मदन मोहन मालविय अध्यापक व अध्यापन राष्ट्रीय मंडळ आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर - सेक्युरिटी व डाटा सायन्स' या विषयावर सहा दिवशीय अभ्यासक्रम कार्यशाळेचे आयोजन केले आहे. २ डिसेंबर ते ७ डिसेंबर या दरम्यान ही कार्यशाळा होईल. त्यात ८० हून अधिक प्राध्यापक सहभागी होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ.नंदकुमार राठींनी दिली.

बीड
सकाळ » TODAY
सोमवार, २ डिसेंबर २०१९ ४

Shri Amolak Jain ... Mandal's ... Science College, Kada
LIBRARY

## कडा येथे सायबर सेक्युरिटी कार्यशाळा

**कडा, ता. १ (बातमीदार) :** आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी 'सायबर सुरक्षा आणि माहितीशास्त्र' या विषयावरील कार्यशाळा सोमवारी (ता. दोन) होणार आहे. कडा येथील अमोलक जैन विद्याप्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय आणि मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकारच्या पंडित मदनमोहन मालवीय अध्यापक व अध्यापन राष्ट्रीय मंडळ आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यातर्फे सायबर सेक्युरिटी व डाटा सायन्स या विषयावर सहादिवसीय शॉर्टटर्म अभ्यासक्रम कार्यशाळा सोमवार ते शनिवारपर्यंत (ता. दोन ते सात) होणार आहे. डॉ. के. व्ही. काळे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी ही माहिती दिली.

**के.व्ही. काळे यांचे मार्गदर्शन : फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे उद्घाटन; कार्यशाळेत अमोल बागल देणार प्रशिक्षण**

# गांधी महाविद्यालयात 'सायबर सुरक्षा, माहितीशास्त्र' विषयावर कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय आणि मानव संसाधन विकास मंत्रालय भारत सरकारच्या पं.मदन मोहन मालवीय अध्यापक व अध्यापन राष्ट्रीय मंडळ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व गांधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्स' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे २ डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी संचालक व संगणक शास्त्राचे विभाग प्रमुख प्रा.के. व्ही.काळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चनोदिया होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.हरिदास विधाते व महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.उमेश गांधी होते. प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी, प्रा.नरेंद्र गवळी संयोजक डॉ. विशाल वैद्य व डॉ.सुदाम जाधव उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.कारभारी काळे यांनी 'सायबर सुरक्षा व माहितीशास्त्र' ही काळाची गरज आहे तसेच व्यावहारिक विश्व बँकिंग सोशल मीडिया या आर्टिफिशियल लर्निंगच्या काळात यांच्या गरजेचे प्रतिपादन केले. या कार्यशाळेसाठी अमोल बागल हे प्रशिक्षण देणार आहेत. प्राचार्य हरिदास विधाते, प्राचार्य नंदकुमार राठी यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विविध महाविद्यालयातील सहभागी प्राध्यापक व संयोजन समितीचे डॉ.सुदाम जाधव, डॉ.रमेश आब्दार, डॉ. राधाकृष्ण जोशी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.विशाल वैद्य यांनी प्राध्यापकांना सायबर साक्षरतेचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन डॉ.अमोल कल्याणकर यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.प्रकाश जाधवर यांनी केले.



आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर सेक्युरिटी व डाटा सायन्स' या विषयावर डेव्हलपमेंट प्रोग्राम झाला.



कडा : येथील गांधी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करताना.

# गांधी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**कडा, ता. २८ (बातमीदार) :** अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभागामार्फत मंगळवारी (ता. २६) भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी हे होते. भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे यावेळी पूजन करण्यात आले. याप्रसंगी सर्व मान्यवर, विद्यार्थी, विद्यार्थिनी व उपस्थितांनी संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. नंदकुमार राठी म्हणाले, भारतीय संविधान म्हणजे भारतालाच नव्हे तर जगाला मिळालेली एक बहुमोल देणगी आहे. या संविधानामुळे आपल्या देशाचा कारभार करणे शक्य झाले. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला घटनेने समान हक्क दिलेले आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे भारतीय संविधानाचा पाया आहे. त्यामुळे भारतासारख्या मोठ्या देशात विविध जातिधर्मांत एकोपा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारतालाच नव्हे तर जगाला मिळालेली एक देणगी असल्याचेही प्राचार्य डॉ. राठी म्हणाले. यावेळी प्रा. गोंदकर व प्रा. सुपर्णा देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. विधाते, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अनिल गर्जे यांनी केले. यावेळी मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. अनारसे व प्रा तळेकर यांनी पुढाकार घेतला.

# गांधी महाविद्यालयात विद्यार्थी, मान्यवरांनी घेतली शपथ

## मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवान, नागरिकांना श्रद्धांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागातर्फे भारतीय संविधान दिन आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी हे होते.

प्रथम भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी सर्व मान्यवर व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानची शपत घेतली. यावेळी डॉ. नंदकुमार राठी म्हणाले की, भारतीय संविधान म्हणजे भारतालाच नव्हे तर जगाला मिळालेली एक देणगी आहे. कारण संविधानामुळे एवढ्या मोठ्या खंडप्राय देशाचा कारभार करणे शक्य झाले आहे. भारतीय राज्यघटना लिखित आहे. त्यामुळे तिच्यामध्ये सहज बदल होणे अशक्य आहे. आज पर्यंत १०० वेळा घटना दुरुस्ती झाली आहे. पण घोषणेचा मूळ गाभा बदलणे शक्य नाही. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला घटनेने समान हक्क दिलेले आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे भारतीय संविधानचे मूळ आहे. त्यामुळे भारतासारख्या मोठ्या देशात विविध जाती धर्माच्या लोकात एकोपा आहे. डॉ. बाळासाहेब आंबेडकर म्हणजे भारतालाच नव्हे तर जगाला मिळालेली एक देणगी आहे.



कडा येथील गांधी विद्यालयात संविधान दिनाची शपथ घेताना डॉ. नंदकुमार राठी, प्रा. एन. एन. विधाते, प्रा. डॉ. अनिल गर्जे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एन. एन. विधाते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अनिल गर्जे यांनी केले. यावेळी २६ नोव्हेंबर २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना व नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रा. गोंदकर यांनी मनोगत व्यक्त केले. यशस्वीतेसाठी प्रा. अनारसे, तळेकर यांनी प्रयत्न केले.

लोकमत
हॅलो बीड
औरंगाबाद, शनिवार, दि. २३ नोव्हेंबर २०१९

युवक महोत्सव 2019-20

!! युवा महोत्सव !! २०१९-२०

# ढोलकीच्या तालावर ठसकेबाज लावणी

**उत्साह शिगेला :** कलाकारांच्या दिलखेचक अदाकारीने मने जिंकली

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** ढोलकीच्या तालावर ठसकेबाज लावणी, दिलखेचक अदाकारी अन् शिट्ट्या वाजवून रसिकांनी केलेले झिंगाट नृत्य, असे भारावून टाकणारे वातावरण साऱ्यांनी अनुभवले. खऱ्या अर्थाने लावणीने युवक महोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

युवक महोत्सवात महाराष्ट्रातील 'लावणी' हा लोकप्रिय नृत्य प्रकार पाहण्यासाठी रसिकांची झुंबड उडाली होती. अंगात वीज संचारावी तेवढ्याच चपळतेने नृत्यांगना लावणी सादर करीत होत्या. लावणी स्पर्धा नियोजित वेळेच्या दोन तास उशिराने म्हणजेच दुपारी ४ वाजता सुरु झाली आणि रात्री उशिरापर्यंत सुरु होती. गीत, नृत्य आणि अदाकारी यांचा त्रिवेणी संगम असलेली लावणी पाहण्यासाठी दुपारी १ वाजेपासून रसिक स्टेज क्रमांक १ च्या डोममध्ये येऊन बसले होते. 'मला पिरतीच्या झुल्यात झुलवा' या गीतावर अंगात वीज सळसळावी अशी लावणी सादर करून अब्दुल सत्तार या खुलताबाद येथील कोहिनूर कॉलेजच्या विद्यार्थ्याने सर्वांना चकित केले. कडा येथील श्रीमती शांताबाई गांधी महाविद्यालयातील प्रतीक्षा सांगळे हिने 'मला लागली कुणाची उचकी' या लावणीवरील रिमिक्स सादर करून सर्वांना थिरकायला लावले. यानंतर 'बाई मी लाडाची गं लाडाची कैरी पाडाची' या लावणीवरील साक्षी मोगरकर या नृत्यांगनेने केलेल्या दिलखेचक अदाकारीने सर्वांना घायाळ केले. माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयातील ती विद्यार्थिनी होय. सरस्वती भुवन कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील तीन विद्यार्थिनींनी 'कोणी माझ्या रायाला शहाणपण शिकवा' या लावणीवर नृत्य केले त्यावेळी नृत्य करणारी कार्तिकी मगरही चक्कर येऊन स्टेजवरच खाली कोसळली होती. नंतर तिला उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले. महिला कला महाविद्यालय हर्सूल येथील रत्नप्रभा श्रीखंडे व नेहा जाधव या विद्यार्थिनींनी 'रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी' या लावणीवर बहारदार लावणी सादर केली तेव्हा रसिक खुर्चीवर चढून नृत्य करू लागले होते. चला जेजुरीला जाऊ, मला जाऊ द्याना घरी आता वाजले की बारा, या व अन्य लोकप्रिय लावण्यांवरही रसिकांनी शिट्ट्या वाजवून झिंगाट नृत्य केले. या लावणी स्पर्धेने उत्साह शिगेला पोहोचला होता.



## कागदाचे तुकडे, खेळण्यातील नोटांची उधळण

◆ लावणी सुरु असताना समोर बसलेल्या युवकांनी खुर्चीवर चढून नृत्य करण्यास सुरुवात केली. नोटा उधळाव्यात तशा लहान मुलांसाठी असलेल्या खोट्या नोटा उधळणे सुरु केले. त्यांचे पाहून दुसऱ्या युवकांनी कागदाचे तुकडे करून ते उधळण्यास सुरुवात केली. यामुळे थोडा गोंधळ उडाला होता.

# गांधी कॉलेजचे युवक महोत्सवात विशेष प्राविण्य

कडा ( वार्ताहर ):- औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लावणी आणि मुक अभिनय या कला प्रकारात विशेष प्राविण्य मिळवले.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा युवक महोत्सव नुकताच औरंगाबाद येथे पार पडला. यामध्ये कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या बी. सी. ए. विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन यश संपादन केले. यामध्ये लावणी कलाप्रकारात प्रतिक्षा सांगळे आणि मुकअभिनयामध्ये भारती ढोबळे, शुभम कोल्हे, शिवम ढोबळे, शिवानी ढोबळे, जयश्री कदम, सुप्रिया मार्कंडे, अच्युत पवने, महावीर मुनोत यांनी प्राविण्य मिळवले. याशिवाय महाविद्यालयाच्या इतर विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुशा, लोकनृत्य, भारुड, रांगोळी यामध्ये सहभाग घेतला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ, प्राचार्य, उपप्राचार्य, मार्गदर्शक शिक्षक आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# गांधी महाविद्यालयात विद्यार्थी पालकांसाठी ॲप

कडा(प्रतिनिधी):-विद्यार्थी,पालकव शिक्षण यामधील दुवा साधणारे महाविद्यालयीन ॲप तयारकरणारे गांधी महाविद्यालय हे ग्रामीण भागातील पहिले माहा.ठरण्याचाबहुमान मिळवणारे महाराष्टातील एकमेव महा.होय, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.नंदकुमार राठीयांनी केले

मानवी जिवन सुसह्यव सुखकर करण्यासाठी आजच्या माहिती तंत्रज्ञान युगाने महत्वाचा वाटा उचलला आहे.इलेक्टॉनिक माध्यमाच्या साह्याने उद्योग क्षेत्रातिल नामवंत कँपन्या थेट ग्राहकापर्यंत उत्पादन पोहोचतआहेत. यासाठी आपल्या दैनंदिन जिवनाचा भाग बनलेला व आपल्या जीवनाचा एक अविभाज्य अंग असलेल्या मोबाईलमध्ये ॲमेझान,व्हॉटॲप,फेसबुक,व विवीध बँकीग ॲप कार्यरत आहेत हाच उद्येश ठरवुन ग्रामीण भागातील विद्यार्थी,पालक,वशिक्षण यामधील दुवा साधण्यासाच्याद्रष्टीने महाविद्यालयाने महाविद्यालयात असलेल्या विवीध उपक्रम वमाहीतीची देवाण घेवाण करण्यासाठी शैक्षणिक ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातुन विद्यार्थ्याना संस्थेविषयी माहीती,संस्थेच्या सचिवांचा संदेश व महा.चा प्राचार्यांचा संदेश ,प्राध्यापकव विद्यार्थी माहिती ,उपस्थीती नोंद,विद्यापीठ परीक्षा वेळापत्रक,घटकचाचणी ,प्रकल्प,निकाल,ई-लायब्ररी,विवीध महाविद्यालयीन उपक्रम,सुचना, महाविद्यालयातील उपक्रमाची क्षणचित्रे यामधुन विद्यार्थ्यासाठी उपलब्ध असणार आहेत .विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणीवर मात करण्यासाठी देखील हे ॲप उपयुक्त ठरणार आहे.

हे ॲप तयार करण्यासाठी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,कडाचे सर्व पदाधिकारी ,महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ. एन.एस. राठी,उपप्राचार्य जे.एम.भंडारी, प्रा.एस.आर.हासे , प्रा.डॉ.पी.बी. जाधवर,प्रा.डॉ. एस.एस.जाधव , प्रा.डॉ.व्ही.व्ही. वैद्य,प्रा.एन.टी.गव्हळी, प्रसिध्दी विभागप्रमुख प्रा.डॉ, राधाकृष्ण जोशी यांचे सहकार्यलाभले.सदरील ॲपचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते आज शुक्रवार दि.२९/११/२०१९ रोजी सकाळी ठीक १०.०० वा.महाविद्यालयाच्या सभाग्रहात पार पडणार आहे

DRIVE THROUGH USING SBI FASTag
AND GET 7.5% CASHBACK*

# ग्रामीण भागात ॲप तयार करणारे गांधी महाविद्यालय ठरले प्रथम

**कडा, ता. २८ (बातमीदार)** : मराठवाड्याकडे 'दुष्काळवाडा' म्हणून पाहिले जाते; परंतु ही ओळख आता पुसत असून मराठवाडा आता शिक्षणाचे माहेरघर बनत चालले आहे.

विद्यार्थी, पालक व शिक्षक यामधील दुवा साधणारे महाविद्यालयीन ॲप तयार करणारे कडा (ता. आष्टी) येथील गांधी महाविद्यालय हे ग्रामीण भागातील पहिले महाविद्यालय ठरण्याचा बहुमान मिळवणारे महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय असल्याचा दावा प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी गुरुवारी (ता.२८) पत्रकार परिषदेत केला.

मानवीजीवन सुखकर करण्यासाठी आजच्या माहिती तंत्रज्ञान युगाने महत्त्वाचा वाटा उचलला आहे. आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनलेला व आपल्या जीवनाचा एक अविभाज्य अंग असलेल्या मोबाईलमध्ये ॲमेझॉन, व्हॉटस्ॲप, फेसबुक व विविध बँकिंग ॲप कार्यरत आहेत. हाच उद्देश ठेवून ग्रामीण भागातील विद्यार्थी, पालक व शिक्षण यामधील दुवा साधण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाने विविध उपक्रम व माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी शैक्षणिक ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्थेविषयी माहिती, संस्थेच्या सचिवांचा व प्राचार्यांचा संदेश, प्राध्यापक व विद्यार्थी माहिती, उपस्थिती नोंद, विद्यापीठ परीक्षा वेळापत्रक, घटक चाचणी, प्रकल्प, निकाल, ई-लायब्ररी, विविध महाविद्यालयीन उपक्रम, सूचना, महाविद्यालयातील उपक्रमाची क्षणचित्रे यामधून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणींवर मात करण्यासाठी देखील हे ॲप उपयुक्त ठरणार असल्याचे प्राचार्य डॉ. राठी यांनी सांगितले. हे ॲप तयार करण्यासाठी प्राचार्य डॉ. एन.एस.राठी, उपप्राचार्य जे.एम.भंडारी, प्रा.एस.आर. हासे, प्रा.डॉ.पी.बी.जाधवर, प्रा.डॉ. एस.एस.जाधव, प्रा.डॉ.व्ही.व्ही.वैद्य, प्रा.एन.टी.गवळी, प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी यांचे सहकार्य लाभले. सदरील ॲपचे उद्घाटन शुक्रवारी (ता. २९) सकाळी दहाला महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडणार आहे.

लोकमत
हॅलो बीड
औरंगाबाद, शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर २०१९

# गांधी कॉलेजमध्ये 'ॲप'द्वारे पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांमध्ये माहितीची देवाणघेवाण

## नंदकुमार राठी यांची माहिती : कॉलेजची माहिती होणार उपलब्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

आष्टी : विद्यार्थी,पालक व शिक्षकांमध्ये दुवा साधणारे महाविद्यालयीन 'ॲप' तयार करणारे महाराष्ट्रात एकमेव ग्रामीण भागातील पहिले महाविद्यालय ठरण्याचा बहुमान गांधी महाविद्यालयाने मिळवला असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केले.

मानवी जीवन सुखकर करण्यासाठी आजच्या माहिती व तंत्रज्ञान युगाने महत्त्वाचा वाटा उचलला आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या साह्याने उद्योग क्षेत्रातील नामवंत कंपन्या थेट ग्राहकापर्यंत उत्पादन पोहोचवत आहेत. यासाठी आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनलेला व आपल्या जीवनाचा एक अविभाज्य अंग असलेल्या मोबाईलमध्ये ऑनलाईन खरेदी, व्हॉट्सॲप, फेसबुक व विविध बँकिंग ॲप कार्यरत आहेत. याच धर्तीवर ग्रामीण भागातील विद्यार्थी, पालक व शिक्षकांमधील दुवा साधण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाने महाविद्यालयात असलेल्या विविध उपक्रमांच्या माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी शैक्षणिक ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्थेविषयी माहिती, संस्थेच्या सचिवांचा संदेश व प्राचार्यांचा संदेश, प्राध्यापक व विद्यार्थ्यांची माहिती, उपस्थिती नोंद, विद्यापीठ परीक्षा वेळापत्रक, घटक चाचणी, प्रकल्प, निकाल, ई-लायब्ररी, विविध महाविद्यालयीन उपक्रम, सूचना, महाविद्यालयातील उपक्रमाची क्षणचित्रे यामधून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहेत. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणीवर मात करण्यासाठी देखील हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. हे ॲप तयार करण्यासाठी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.राठी, उपप्राचार्य जे.एम.भंडारी, प्रा.एस.आर.हासे, प्रा.डॉ.पी.बी.जाधवर, प्रा.डॉ. एस.एस.जाधव, प्रा.डॉ.व्ही.व्ही.वैद्य, प्रा.एन.टी.गवळी, प्रसिध्दी विभागप्रमुख प्रा.डॉ. राधाकृष्ण ल.जोशी यांचे सहकार्य लाभले. सदरील ॲपचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते २९ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयाच्या सभाग्रहात पार पडणार असल्याचे राठी यांनी सांगितले.




### ॲपच्या माध्यमातून संस्थेविषयी माहिती

- या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्थेविषयी माहिती, संस्थेच्या सचिवांचा संदेश व प्राचार्यांचा संदेश, प्राध्यापक व विद्यार्थ्यांची माहिती, उपस्थिती नोंद, विद्यापीठ परीक्षा, वेळापत्रक, घटक चाचणी, प्रकल्प निकाल, ई-लायब्ररी, विविध महाविद्यालयीन उपक्रमांची माहिती ॲपवर माहिती मिळणार आहे.

- गांधी महाविद्यालयाने हे ॲप तयार केले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी पत्र परिषदेत दिली. तसेच २९ नोव्हेंबर रोजी या ॲपचे उद्घाटन पार पडणार असल्याचे प्राचार्य राठी यांनी सांगितले.

र्वभूमी

दि. २३ ऑक्टोबर २०१९

# गांधी महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.राठी यांनी दिली पाऊण लाखाची पुस्तके भेट



कडा (प्रतिनिधी) - गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार राठी यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयास वाचन प्रेरणा दिनानिमित्त पंच्याहत्तर हजार रुपयांची पुस्तके भेट दिली . कडा येथील अमोलक शिक्षण संस्थेच्या गांधी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ राठी होते . तर समन्वयक डॉ उमेश गांधी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . प्राचार्य डॉ राठी यांनी यावेळी ७० हजाराची आणि पाच हजार रुपयांचे संदर्भ ग्रंथ महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट दिले . ग्रामीण भागात वाचन संस्कृती वाढीस हातभार लागावा यासाठी हा उपक्रम राबवल्याचे डॉ राठी यांनी सांगितले . डॉ उमेश गांधी यांनी ही मनोगत व्यक्त केले . प्रा राजकुमार थोरवे यांनी स्वागत केले तर प्रा धनश्री मुनोत यांनी सूत्रसंचालन केले . उपप्राचार्य जवाहर भंडारी यांच्यासह प्राध्यापक , विद्यार्थी उपस्थित होते .

LIBRARY

दैनिक
दिव्य मराठी
औरंगाबाद, मंगळवार, २२ ऑक्टोबर २०१९

## न्यूज ब्रीफ

# गांधी महाविद्यालयाच्या ग्रंथालयास प्राचार्य डॉ. राठींनी दिली ७५ हजारांची पुस्तके भेट



**कडा |** येथील अमोलक शिक्षण संस्थेच्या गांधी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयास ७५ हजार रुपयांची पुस्तके भेट दिली. कार्यक्रमास समन्वयक डॉ. उमेश गांधी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ग्रामीण भागात वाचन संस्कृती वाढीस हातभार लागावा यासाठी हा उपक्रम राबवल्याचे डॉ. राठी यांनी सांगितले. डॉ. उमेश गांधी यांनीही मनोगत व्यक्त केले. ग्रंथपाल प्रा. डॉ. राजकुमार थोरवे यांनी स्वागत केले. तर प्रा. धनश्री मुनोत यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य जवाहर भंडारी यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गांधी महाविद्यालयातर्फे अनोखी दिवाळी साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात २२ ऑक्टोबर रोजी रसायनशास्त्र विभागाच्या वतीने अनोख्या पद्धतीने दिवाळीचे आयोजन करण्यात आले होते.

अहमदनगर येथील स्नेहालयातील अनाथांसोबत, मातोश्री वृद्धाश्रम येथील वृद्धांसोबत आयोजित दीपदानाप्रसंगी विभागाच्या पदव्युत्तर विभागातील ३५ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. दिवाळीनिमित्त सुगंधी द्रव्ये, तेल, कंगवा, उटणे, टूथपेस्ट, साबण, ब्रश, नेलकटर, टोवेल आणि पणत्या यासोबतच फराळाच्या वस्तू शेव चिवडा, जिलेबी यांच्या वाटपाचा विद्यार्थ्यांनी मनापासून आनंद घेतला. तसेच सर्व नविन जन्मलेल्या तान्ह्या बाळांना नवीन कपडे देण्यात आले. या सर्व वस्तू रसायनशास्त्र विभागाच्या पदव्युत्तर विभागाच्या विद्यार्थ्यांनी जमविल्या होत्या. स्नेहालयचे संचालक डॉ. गिरीश कुलकर्णी स्वतः याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या खास आग्रहास्तव उपस्थित झाले. या उपक्रमाबद्दल कुलकर्णी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ. ज. मो. भंडारी, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुपर्णा देशमुख यांचे तसेच विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले. यासोबतच मातोश्री वृद्धाश्रम येथे देखील फराळाच्या पदार्थांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित वृद्धांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद दिले. यासोबतच अहमदनगर येथील औद्योगिक वसाहतीतील श्रीराम कोटिंग्स प्रा. लि. या रसायनशास्त्राशी संबंधित कारखान्यास देखील भेट देण्यात आली.



कडा येथील गांधी महाविद्यालयात मंगळवारी रसायनशास्त्र विभागाच्या वतीने वृद्धाश्रम, अनाथ मुलांना विविध वस्तुंची भेट दिली. यावेळी प्राध्यापकांसमवेत रसायनशास्त्र विभागाचे विद्यार्थी दिसत आहेत.

या अभ्यास दौऱ्याचे संपूर्ण नियोजन स्नेहालयचे अजित कुलकर्णी व विभाग प्रमुख डॉ सुपर्णा देशमुख यांनी केले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः श्रमदान करुन मानवतेचे मंदिर अहमदनगर येथे दुपारचे भोजन केले. अशा प्रकारे संपूर्ण दिवस अत्यंत उत्साहाने व अनोख्या पद्धतीने आयोजन करण्यात आलेल्या दिवाळी उत्सवाचा विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. याप्रसंगी रसायनशास्त्र विभागातील डॉ. सुपर्णा देशमुख, प्रा.आशिष कटारिया, प्रा. राहुल देसाई, सुनील लोमटे, रंजू जाजडा हे विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. या उपक्रमाचे कांतिलाल चाणोदिया, हेमंतकुमार पोखरणा, डॉ. उमेश गांधी, अनिल झाडमुथ्था, गोकुळदास मेहेर, योगेश भंडारी तसेच इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी कौतुक केले.

## अवतीभवती




**कडा : गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. अशोक कोरडे.**

# कडाच्या गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन

**कडा :** महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त श्री अमोलक जैन मंडळाच्या कडा येथील गांधी महाविद्यालयात मंगळवारी (ता. २४) राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक कोरडे उपस्थित होते. डॉ. कोरडे म्हणाले, की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रभक्ती व राष्ट्रसेवा वाढीस लागते. विद्यार्थी व स्वयंसेवकांनीही एक सुवर्णसंधी समजून राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यास प्रामाणिकपणे वाहून घेतले पाहिजे. असे झाल्यास ग्रामस्थ एकत्र येऊन लहान गावांचा विकास साधण्यास मदत होईल. यावेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. एन. एन. विधाते यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पांडुरंग अनारसे, डॉ. राजकुमार थोरवे, डॉ. अण्णासाहेब शेळके, डॉ. सुनील पंढरे, प्रा. शिवाजी भोसले; तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. अनारसे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुपर्णा देशमुख यांनी आभार मानले.



# गांधी महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनींना पोशाख वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील श्रीमती एस के गांधी महाविद्यालयामध्ये महसूलमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या वतीने मुलींना पोशाख वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बाबूलाल भंडारी तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी हे होते.

प्राचार्य राठी म्हणाले, चंद्रकांत दादा पाटील यांनी वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून महाविद्यालयात सर्व विद्यार्थिनींना रक्षाबंधन भेट म्हणून संपूर्ण पोशाखाचे वाटप करुन त्यांनी एक प्रकारे सामाजिक बांधिलकी जपली आहे. कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थिनींना प्रमुख पाहुणे बाबुलाल भंडारी व प्राचार्य नंदकुमार राठी तसेच उपप्राचार्य जवाहरलाल भंडारी यांच्या हस्ते पोशाखाचे वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व प्राध्यापक प्राध्यापिका व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी, प्रा.डॉ. विशाल वैद्य, प्रा.डॉ. योगेश रसाळ, प्रा.डॉ.सुदाम जाधव, प्रा.डॉ. अमोल कल्याणकार, प्रा.मीरा नाथ, प्रा. सुनीता बोंबे, प्रा. धनश्री मुनोत, प्रा.डॉ. अरुणा कुलकर्णी, प्रा.डॉ. काझी तन्वीर, प्रा. तेजश्री गोरे, प्रा. कोमल पवळ, प्रा. भाग्यश्री बोरा, प्रा.महाजन, प्रा.हजारे व इतरांनी प्रयत्न केले.

पुण्य नगरी
SMART बीड
बुधवार,२५ सप्टेंबर २०१९

LIBRARY

# शैक्षणिक मूल्यांची जपणूक विद्यार्थ्यांनी करावी : प्रा.कंदले

**कडा / प्रतिनिधी :** सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना गरजू आणि गरीबांना मदत कशी करता येईल यासाठी अनेक लोक धडपड करीत असतात. विद्यार्थ्यांनी अशा कार्यातून शैक्षणिक मूल्यांची जपणूक करावी असे आवाहन प्रा.सचिन कंदले यांनी केले.

गांधी महाविद्यालयांमध्ये मुलींना ड्रेसचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सचिन कंदले, बाबूशेठ भंडारी तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मार्गदर्शक प्रा. सचिन कंदले म्हणाले, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सतत अग्रेसर असणारे लोक प्रेरणादायी असतात. अशा कार्यक्रमांमधून प्रेरणा घेऊन शैक्षणिक मूल्यांची जपणूक विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यामध्ये करावी. यातूनच त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.अध्यक्षीय समारोप नंदकुमार राठी यांनी केला. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनींना प्रमुख पाहुणे प्रा. सचिन कंदले, बाबूलाल भंडारी, प्राचार्य नंदकुमार राठी तसेच उपप्राचार्य जवाहरलाल भंडारी यांच्या हस्ते ड्रेसचे वाटप केले. तसेच सर्व प्राध्यापक,कर्मचारी उपस्थित होते.

Shri Amolak Jain Vidhya Prasarak Mandal's
LIBRARY
Gandhi Arts, Commerce & Science College

पार्श्वभूमी
दि. २४ सप्टेंबर २०१९

# गांधी महाविद्यालयातील विद्यार्थीनींना पोषाख वाटप

आष्टी (प्रतिनिधी):-कडा येथील श्रीमती एस के गांधी महाविद्यालयामध्ये महसूलमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मुलींना पोषाख चे वाटप करण्यात आले. या कार्येक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे संचालक बाबूशेठ भंडारी तर कार्येक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार राठी हे होते.

या वेळी बोलताना प्राचार्य राठी म्हणाले की, ना चंद्रकांत दादा पाटील यांचा वाढदिवस हा वेगवेगळ्या उपक्रमाने साजरा केला जातो त्या निमित्ताने महाविद्यालयात सर्व विद्यार्थिनींना रक्षाबंधन भेट म्हणून संपूर्ण पोषाखाचे वाटप करून त्यांनी एक प्रकारे सामाजिक बांधीलकी जपली आहे. कार्येक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांनीना प्रमुख पाहुणे बाबुलाल शेठ व प्राचार्य नंदकुमार राठी तसेच उपप्राचार्य जवाहरलाल भंडारी यांच्या हस्ते पोषाखाचे वाटप करण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापिका व प्राध्यापकेत्तर पान २ वर

## गांधी महाविद्यालयातील विद्यार्थीनींना

कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्येक्रम यशस्वीतेसाठी प्रा डॉ राधाकृष्ण जोशी, प्रा डॉ विशाल वैद्य, प्रा डॉ योगेश रसाळ, प्रा डॉ सुदाम जाधव, प्रा डॉ अमोल कल्याणकार, प्रा मीरा नाथ, प्रा सुनीता बोंबे, प्रा धनश्री मुनोत, प्रा डॉ अरुणा कुलकर्णी, प्रा डॉ काझी तन्वीर, प्रा गोरे तेजश्री, प्रा कोमल पवळ, प्रा बोरा भाग्यश्री, प्रा महाजन मॅडम, प्रा हजारे मॅडम व इतरांनी प्रयत्न केले.

Shri Amolak Jain Vidhya Prasarak Mandal's Gandhi Arts, Commerce & Science College, Kada
LIBRARY


# पार्श्वभूमी

दि. २३ सप्टेंबर २०१९


## हैद्राबाद मुक्ती संग्राम हा जनतेचा लढा - प्राचार्य नंदकुमार राठी

आष्टी( प्रतिनिधी )- हा मराठवाडा मुक्ती संग्राम लढा नसुन तो हैद्राबाद मुक्ती संग्राम लढा आहे आणि हा लढा जनतेचा लढा होता असे प्रतिपादन गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार राठी यांनी केले. अमोलक संस्थेचे कार्यकारी संचालक बाबुलाल भंडारी, सचिन कदले व तात्यासाहेब पोकळे आदी मान्यवर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.इतिहास संकलन समिती व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेबंर हा हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिन हा इतिहास दिन म्हणून साजरा करण्यात आला. आष्टी तालुक्यातील जेष्ठ स्वातंत्र सैनिक साहेबराव थोरवे (दादा) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी हैद्राबाद स्वातंत्र लढ्यातील अनुभव बाबुराव मुटकुळे, स्वतंत्र सैनिक साहेबराव दादा पान २ वर

### हैद्राबाद मुक्ती संग्राम हा जनतेचा लढा

थोरवे, तात्यासाहेब पोकळे यांनी आष्टी तालुक्यातील लढ्यातील अनुभव सांगीतले. डॉ.राधाकृष्ण जोशी यांनी प्रास्तविक केले. डॉ योगेश रसाळ यांनी पाहुण्याचा परीचय करून दिला. डॉ.कल्याणकर यांनी सुत्रसंचलन केले तर प्रा. नवनाथ विधाते यांनी आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

LIBRARY

लोकमत

हॅलो बीड

औरंगाबाद, शनिवार, दि. २८ सप्टेंबर २०१९




# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त तसेच राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कडा येथील गांधी महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनाचे डॉ.अशोक कोरडे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. कोरडे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. एन.एन. विधाते यांनी केले. यावेळी डॉ. पांडुरंग अनारसे, डॉ. राजकुमार थोरवे, डॉ अण्णासाहेब शेळके, डॉ. सुनिल पंढरे, प्रा. शिवजी भोसले, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अनारसे यांनी केले तर डॉ. सुपर्णा देशमुख यांनी आभार व्यक्त केले.

दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
बीड दर्पण
बुधवार, दि.२५ सप्टेंबर २०१९
पान ३

LIBRARY

# भविष्यात बीड जिल्हा ऑल्पीयन खेळाडू तयार करणारा ठरेल

## बाल कुस्तीपटू अल्फीया शेख यांच्या वाढदिवसानिमित्त क्रीडारत्न पुरस्कार सोहळ्यात हिंद केसरी पै. दिनानाथसिंह यांचे प्रतिपादन

बीड, दि.२४(प्रतिनिधी): कधीकाळी ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून बीड जिल्ह्याची ओळख होती. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे हा जिल्हा राजकीय पटलावर पुढे आला. परंतु क्रीडा क्षेत्रामध्ये बीड जिल्हा नेत्रदिपक प्रगती करत आहे, ही बाब आज बीडमध्ये आल्यानंतर प्रकर्षाने जानवली. राहुल आवारे सारखा कर्तबगार तरुणाने जागतिक स्तरावर कुस्तीमध्ये बीड जिल्ह्याचे रोशन केले आहे. जब्बार शेख यांची कन्या बाल कुस्तीपटू अल्फीया शेख सारखी प्रतिकुल परिस्थितीवर मात करत पुढे येत आहे. कोणताही खेळाडू नामवंत होण्यासाठी बापासोबत आईचे देखील पाठबळ महत्वपूर्ण ठरते. आज क्रीडा क्षेत्रात महिला मोठ्या संख्येने पुढे येत आहेत यामध्ये बीड जिल्हा देखील मागे नाही. त्यामुळे ऊसतोड मजुरांचा जिल्हा ही ओळख पुसून भविष्यात ऑल्पीयनमध्ये सुवर्णपदक पटकावणारा बीड जिल्हा ठरु शकेल असा आशावाद हिंद केसरी पै. दिनानाथ सिंह यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय कुस्ती महासंघाचे जिल्हाध्यक्ष जब्बार शेख यांच्या संकल्पनेतून त्यांची कन्या बाल कुस्तीपटू अल्फीया शेख यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे दि.२३ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता क्रीडारत्न पुरस्कार सोहळा शानदार कार्यक्रमाने रंगला.

पुढे बोलताना हिंद केसरी पै. दिनानाथ सिंह म्हणाले की, विशेष बाब म्हणजे एका सामान्य कुटूंबातील कर्तृत्वान मुलीच्या वडीलांनी कन्यारत्न दिनी मुलीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तमाम विविध क्रीडा क्षेत्रातील क्रीडारत्नांचा गुणगौरव करुन कुस्ती खेळणाऱ्या तमाम मुलींचा देखील त्यांच्या वजना एवढ्या पुष्पहाराने मान्यवरांसह स्वागत केले, असा सोहळा मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदा पाहत आहे. कुस्तीपासून अनेक फायदे आहेत, शरीर तंदुरुस्त राहतेच या शिवाय क्रीडा क्षेत्रातील नाव उज्वल होते. प्रामुख्याने मुलींना कुस्ती क्षेत्रामध्ये भविष्यात अधिक संधी आहेत. या संधीचं सोन बीडच्या मुलींनी करावं आणि जागतिक स्तरावर नामांकीत व्हावं. सर्वोत्कृष्ट खेळाडू जर तुम्ही झाले तर नाव लौकिकासोबत भविष्यात प्रशासकीय सेवेसह विविध विभागामध्ये मानाचे स्थान मिळण्याची संधी क्रीडा क्षेत्र मिळवून देते. बाल वयापासूनच योग्य मार्गदर्शन आणि कुटूंबाची साथ खेळाडूला मिळाली तर तो परिपक्व घडतो असे पाठबळ बीड जिल्ह्यातील पालक मोठ्या संख्येने देत असल्याचे या ठिकाणी जाणवले. त्यामुळे भविष्यात क्रीडा क्षेत्रातील महत्वपूर्ण ऑल्म्पीक स्पर्धेत बीड जिल्हा आपले नाव रौशन करेल असा आशावाद व्यक्त केला. ॲड. शेख शफीक, वनश्री सखाराम शिंदे, शिवसेना नेत्या ॲड. उज्वलाताई भोपळे आर्दीनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला जिल्हाभरातून कुस्तीपटूंसह विविध क्रीडा क्षेत्रातील खे[illegible] मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रीडारत्न पुरस्काराचे हे ठरले मानकरी

उसतोड कामगारांच्या मुलांना कुस्तीचे धडे विनामुल्य शिकवणारे पै.मारुती मुंडे यांच्यासह कोस्ती कोच बाळासाहेब आवारे, कब्डी कोच प्रतीभा आर्सुळ, कुस्ती कोच सुनील तोडकर, विष्णु आदनाक, उज्वल गायकवाड, बॉडी बिल्डींग कोच आशीर्यान उल्हाह, सारीकाताई जगताप, जयश्री अविनाश बारगजे, गव्हाणे सर, गोरख कैवाडे, मिराम सर, कछवाह वर्षाताई, जुमीर सय्यद, अजहर शेख, मंगलाताई लोखंडे, शेख अन्वर, शितल गोपीशेट्टी, पिराजी कुसळे, बलभीम ढेरे, कविताताई गीते, शेख इसाक, डोंगरे सर, फरजाना बाजी, चित्राताई आगळे, डॉ.प्रा.भिमा माने या मान्यवरांना हिंद केसरी दिनानाथ सिंह सह व्यासपीठावरील प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

# कडा येथे इकोफ्रेंडली गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात व्यवस्थापन विभागाच्या वतीने २९ व ३० ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय इकोफ्रेंडली गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा झाली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी तर प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर येथील अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे, उपप्राचार्य डॉ.जे.एम. भंडारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे समन्वय प्रा. मीरा नाथ उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ.राठी, डॉ. रवींद्र चोभे, प्रा. मीरा नाथ यांनी कार्यशाळा घेण्यामागील भूमिका स्पष्ट करुन पर्यावरण संतुलनाचे महत्व सांगितले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी ७६ गणेशमूर्ती तयार केल्या. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यशस्वीतेसाठी डॉ. सुदाम जाधव, डॉ. विशाल वैद्य, डॉ.अरुणा कुलकर्णी, प्रा. सुनीता बोंबे, डॉ. तन्वीर काझी, डॉ. प्रकाश जाधवर, प्रा. शिवाजी जगदाळे, प्रा. सोमनाथ हसे, प्रा. नवनाथ. कराळे, प्रा. पवळ, प्रा. वाघुले यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.अमोल कल्याणकर तर आभार प्रा. धनश्री मुनोत यांनी मानले.



गांधी महाविद्यालयातील कार्यशाळेत सहभागी प्राध्यापक, विद्यार्थी.

लोकमत
हॅलो बीड
औरंगाबाद, बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०१९

# गांधी महाविद्यालयात दोन दिवसीय कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयातील दोन दिवसीय कार्यशाळेस उपस्थित मान्यवर.

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय व नॉलेज ब्रीज अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने २१ व २२ सप्टेंबर रोजी 'इ कन्टेन्ट डेव्हलपमेंट फॉर इफेक्टीव्ह टिचिंग' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयात पार पडली. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया, प्रधानमंत्री हेमंतकुमार पोखरणा, कोषाध्यक्ष अनिलकुमार झाडमुथा, समन्वयक उमेश गांधी, विश्वस्त पोपटलाल भळगट, प्राचार्य डॉ. एन.एस. राठी, उपप्राचार्य जे.एम. भंडारी, बाफना, ढवळे तसेच प्रमुख वक्ते म्हणून भूषण कुलकर्णी व एकनाथ कोरे उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.उमेश गांधी यांनी इ कन्टेन्टचे फायदे व तोटे विशद केले. संस्थेचे प्रधानमंत्री हेमंत पोखरणा यांनी संस्थेच्या व महाविद्यालयाच्या विकासाची माहिती देऊन प्राचार्य व प्राध्यापकांची प्रशंसा केली. प्राचार्य डॉ. राठी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन इ कन्टेन्टचे महत्व सांगितले.

या नंतर मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील विविध प्राध्यापकांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यामध्ये प्राचार्य एन.एस. राठी, प्रा. डॉ. एस.एस. जाधव, प्रा. डॉ.व्ही.व्ही. वैद्य, प्रा. सय्यद, प्रा. एस.एम. जगदाळे, प्रा. मीरा नाथ, प्रा.एन.जी. कराळे, प्रा. एस.आर. हसे, प्रा. पी.टी. जाधवर, प्रा.डॉ.के.एन.कोईनकर,प्रा.डॉ.चौव्हाण, प्रा.डॉ. मदन मार्कंडे व प्रा.एन.टी. गवळी यांच्या पुस्तकाचा समावेश होता.

सूत्रसंचालन ए.एस. कल्याणकर तसेच प्रास्ताविक प्रा. गवळी यांनी तर मान्यवरांचे आभार डॉ.जाधव यांनी मानले.

या दोन दिवसीय कार्यशाळेसाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, आसाम, गुजरात व इतर राज्यातून प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

LIBRARY

झुंजार नेता
॥ दिनांक : ११ ऑगस्ट २०१९ ॥ वार : रविवार

Shri Amolak Jain Vidya Prasarak Mandal's ... Arts, Commerce & Science College, Kada
LIBRARY

# गांधी महाविद्यालयांमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून सहा विद्यार्थ्यांची निवड

कडा , दि.१० (प्रतिनिधी) :- कडा येथील गांधी महाविद्यालयात आय. सी. आय. सी. आय. बँकेने घेतलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमधून सहा विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली. आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या वतीने हर्षल पडवळ व प्रमोद समुद्रे यांनी काम पाहिले. महाविद्यालयातून मागील तीन वर्षांमध्ये पदवी घेतलेल्या ९० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली ,पैकी ५८ विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षा दिली. या सर्वांची ऑनलाइन परीक्षा व इंग्राजी भाषेविषयी परीक्षा घेण्यात आली. सदर परीक्षेमधून बारा विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी आयसीआयसीआय बँकेच्या अहमदनगर येथील शाखा केडगाव येथे बोलावण्यात आले. त्यामधून सहा विद्यार्थ्यांना बँकमध्ये विक्री अधिकारी पदासाठी संधी देण्यात आली. कोल्हापूर येथील आयसीआयसीआय बँकेच्या प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रथमतः वैभव पवार, शुभम बनसोडे व सोहेल शेख यांना विशेष निवासी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले. श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ.जवाहरलाल भंडारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या कामी प्लेसमेंट विभाग अध्यक्ष प्रा. डॉ. योगेश रसाळ, प्रा. डॉ. किशोर कोईनकर, प्रा. डॉ. राधाकृष्ण जोशी, प्रा. डॉ. मदन मार्कंडे, प्रा. सय्यद युनूस, प्रा. डॉ. गर्जे, प्रा. डॉ. अनारसे, प्रा. जगदाळे, प्रा. मिरा नाथ, प्रा. डॉ. वैद्य, प्रा. गवळी, प्रा. गोंदकर, प्रा. हासे यांनी सहकार्य केले.क

लोकमत
हॅलो बीड | औरंगाबाद, शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट २०१९ | ४

LIBRARY

# बास्केटबॉल स्पर्धेत गांधी कॉलेज विजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या मैदानावर सोमवारी व मंगळवारी घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत गांधी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पितांबरी महाविद्यालय पडेगाव औरंगाबाद या संघावर १९ गुणांनी मात करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ बास्केटबॉल चषक पटकावला.

### औरंगाबाद संघावर मात

◆ गांधी कॉलेजच्या मैदानावर झालेल्या आंतर महाविद्यालयानी स्पर्धेत १३ संघांचा सहभाग होता. यात औरंगाबाद संघावर कडा संघाने १९ गुणांनी मात केली.

विजेत्या संघाला प्रा.डॉ.जमीर सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत एकूण १३ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते. विजेत्या संघास संस्थेचे हेमंतकुमार पोखरणा, अनिल झाडमुथ्था, डॉ. बा.आं.म.विद्यापीठाचे क्रीडा संचालक दयानंद कांबळे या मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व चषक देऊन गौरविण्यात आले. विजेत्या संघाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ. भंडारी, डॉ.सुनील पंढरे, प्रा. मीरा नाथ व सर्व प्राध्यापकांनी स्वागत केले.

# जलतरणमध्ये यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**माजलगाव :** येथील सिद्धेश्वर विद्यालयाने आंतरशालेय जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत यश मिळविले. त्रिनयन भाळशंकर ५० मी. बॅकस्ट्रोक द्वितीय, साईदीप व्हरकटे ५० मी. बटरफ्लाय द्वितीय, स्वप्नील सक्राते हा १०० व २०० मी. बटरफ्लाय प्रथम, पवन व्हरकटे ४०० मी. वैयक्तिक प्रकारात प्रथम, मयूर बनने ४ बाय १०० मी. फ्रीस्टाईल रिलेमध्ये यश मिळविले



**बीड : बास्केटबॉल स्पर्धेतील विजेत्या संघासोबत हेमंतकुमार पोखरणा, अनिल झाडमुथ्था, दयानंद कांबळे, नंदकुमार राठी, जमीर सय्यद, सुनील पांढरे आदी.**

# बास्केटबॉलमध्ये गांधी महाविद्यालयाचे यश

**कडा :** येथील गांधी महाविद्यालयाच्या मैदानावर सोमवारी व मंगळवारी (ता. २६, २७) घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत गांधी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करीत पीतांबरी महाविद्यालयाच्या (पडेगाव, जि. औरंगाबाद) संघावर १९ गुणांनी मात करीत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत एकूण १३ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते. विजेत्या संघास संस्थेचे हेमंतकुमार पोखरणा, अनिल झाडमुथ्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक दयानंद कांबळे यांच्या हस्ते करंडक देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ. भंडारी, डॉ. सुनील पंढरे, प्रा. मीरा नाथ व सर्व प्राध्यापकांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

# गांधी महाविद्यालयातर्फे पुरग्रस्तांसाठी मदत फेरी

कडा दि. २१ (प्रतिनिधी):– दि.१४ रोजी गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आपत्ती व्यवस्थापन मार्फत सांगली कोल्हापूर येथील पुरग्रसतांसाठी मदत फेरी संपूर्ण कडा गावातून काढण्यात आली. गावकऱ्यांनी सरळ मदत करत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला गावातून जमा झालेली रक्कम रू.३१०००/– हजार मुख्यमंत्री सहाय्यता निधी म्हणून मा.तहसलिदार आष्टी यांच्याकडे जमा करण्यात येणार आहेत. या फेरीमध्ये गांधी महाविद्यालय कडा चे प्राचार्य डॉ.नंदकुमार हे संपूर्ण फेरीत सक्रीय पणे सभागी होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी विद्यार्थीनी अत्यंत हिरीने भाग घेतला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, प्रा.नवनाथ विधाते, डॉ.अनारसे व डॉ.सौ.सुवर्णा देशमुख संपूर्ण फेरीमध्ये सहभागी होते.

# गांधी महाविद्यालय कडा येथे वृक्षारोपनाचा कार्यक्रम

कडा दि. २१ (प्रतिनिधी):– येथील गांधी महाविद्यालयात कडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्फत वृक्षारोपनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी संस्थेचे पदाधिकारी डॉ.अशोक गांधी यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाच्या परिसरात १५० विविध जातीची झाडे लावण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी वृक्षाचे महतव व सांगोपन या विषयी सक्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मानवी जिवनात वृक्षाचे महत्व आणि आरोग्य या विषयी डॉ.अशोक गांधी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सदरील सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.विधाते एन.एन., डॉ.बी.एस, डॉ.सुवर्णा देशमुख, यांनी परिश्रम घेतले. तसेच प्रा.डॉ.आण्णासाहेब शेळके यांनी वृक्षारोपन प्रसंगी झाडे उपलब्ध करून पाण्याची व्यवस्था करून दिली.

पार्श्वभूमी
दि. २८ ऑगस्ट २०११

LIBRARY

# ग्रामीण भागातील खेळाडू घडविण्याचे काम अमोलक जैन संस्थेने केले– प्राचार्य राठी

आष्टी (प्रतिनिधी):–बास्केटबॉल या खेळाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्याचे काम अमोलक संस्थेच्या माध्यमातून गांधी महाविद्यालयाने केले आहे. या महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाने ग्रामीण भागातील खेळाडू राज्य स्तरावरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार राठी यांनी केले. ते गांधी महाविद्यालय कडा व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेच्या अध्यक्षीय भाषणात (ता २६) बोलत होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अमोलक जैन संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया, उपसरपंच योगेश भंडारी तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे क्रीडासंचालक डॉ दयानंद कांबळे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ हरिदास विधाते, हेमंतकुमार पोखरणा, डॉ उमेश गांधी, डॉ महेन्द्र पटवा उपस्थित होते. यावेळी डॉ. दयानंद कांबळे आपल्या भाषणात म्हणाले की, भारताची क्रीडा संस्कृती वाढावी तसेच विद्यार्थ्यांच्या मनात खेळाविषयी पान २ वर

दरवर्षी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. तर डॉ हरिदास विधाते यांनी सांगितले की, गांधी महाविद्यालय व बास्केटबॉल हे समीकरण डॉ जमीर सर यांनी पूर्वीपासूनच निर्माण केले असून त्याचा ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे. उपप्राचार्य डॉ भंडारी यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ जमीर सय्यद यांनी तर खेळाची सविस्तर माहिती प्रा डॉ सुनिल पंढरे यांनी दिली. या स्पर्धेसाठी मुलांचे नऊ तर मुलींचे चार संघ सहभागी झाले. यावेळी प्रा डॉ जमीर सय्यद, विद्यापीठ बास्केट बॉल संघाची माजी कर्णधार प्रा मीरा नाथ, प्रा अरुणा कुलकर्णी, प्रा धनश्री मुनोत यांनी खेळाडूंची ओळख करून घेत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा धनश्री मुनोत तर आभार प्रा डॉ योगेश रसाळ यांनी मानले.

झुंजार नेता
बीड महाराष्ट्र
• दिनांक : २२ ऑगस्ट २०१९ • वार : गुरुवार • पान ३

# गांधी महाविद्यालयाचे वृक्षारोपण आणि मदत फेरी

कडा, दि. २१ (प्रतिनिधी):- कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच पुरग्रास्तांसाठी मदत फेरी काढण्यात आली.

कडा येथील अमोलक शिक्षण संस्थेच्या गांधी वरिष्ठ महाविद्यालयात डॉ. अशोक गांधी आणि प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. तसेच कोल्हापूर , सांगली जिल्ह्यातील पुरग्रास्तांसाठी मदत फेरी काढण्यात आली . या फेरीतून गोळा झालेल्या मदतीत भर घालून ३१ हजार रुपयांचा निधी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री सहायता निधीस देण्यात आला . या दोन्ही उपक्रमात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.

सकाळ » TODAY



कडा : पूरग्रस्तांसाठी काढलेल्या फेरीत जमा झालेली रक्कम मुख्यमंत्री साहाय्यता निधीला देताना पदाधिकारी, विद्यार्थी.

# गांधी महाविद्यालयातर्फे पूरग्रस्तांना मदत

**कडा, ता. २० (बातमीदार)** : पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत पूरसदृश्य परिस्थितीने अनेकांची घरे व संसार उद्ध्वस्त झाले असून मोठ्या प्रमाणात जीवितहानी तसेच नुकसान झाले आहे. त्यांना मदत करण्याच्या दृष्टीने गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. राठी यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख प्रा. मीरा नाथ यांनी आपत्ती व्यवस्थान विभागातर्फे बुधवारी (ता १४) कडा येथे मदत फेरी काढण्यात आली.

प्राचार्यांसह प्राध्यापक व विद्यार्थिनींनी सढळ हातांनी मदत करून फेरी काढली. शहरातील शिवाजी चौक, मार्केट यार्ड, भाजीमंडई, कापड बाजार, सराफ बाजार, ग्रामपंचायत, मराठा गल्ली भागात फेरी सुरू असताना सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, दुकानदारांनी मदत केली. फेरीत प्राचार्य डॉ. एन. एन. राठी, उपप्राचार्य जे. एम. भंडारी, डॉ. सुदाम आघाव, डॉ. विशाल वैद्य, डॉ. रावजी जगदाळे, डॉ. अमोल कल्याणकर, डॉ. धनश्री मुनोत, प्रा. बोंबे, डॉ. किशोर कोईनकर, प्रा. नवनाथ कराळे, प्रा आशिष कटारिया, डॉ. राधाकृष्ण जोशी, डॉ. किशोर तळेकर, डॉ. जमीर सय्यद, डॉ. जाधवर, डॉ. हसे, प्रा. नरेंद्र गवळी, डॉ. अनारसे, डॉ. कोरडे, प्रा. डॉ. गव्हाणे, प्रा. मार्कंडे, प्रा. शिंदे, प्रा. भोसले, प्रा. डॉ. चौधरी, डॉ. तन्वीरबेगम काझी आदी उपस्थित होते. या वेळी ३१ हजार १०० रुपयांची मदत मुख्यमंत्री साहाय्यता निधीसाठी देण्यात आली.



आष्टी येथील गांधी महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फे मदतफेरी काढून पूरग्रस्तांना मदत केली.

# गांधी कॉलेजतर्फे पूरग्रस्तांना फेरीद्वारे मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी** : पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात महापुराने जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेकांचे घरे व संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अशा संकटाच्या काळात मदत व्हावी, या विधायक भूमिकेतून गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य एन.एन. राठी यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व्यवस्थापविभागाच्या प्रमुख प्रा.मीरा नाथ यांनी आपत्ती व्यवस्थानच्या वतीने फेरी काढली.

हा विभाग कोणत्याही नैसर्गिक आपत्तीसमयी मदतीसाठी उभा रहातो. या फेरीची सुरुवात महाविद्यालयातून झाली. ही मदत फेरी कडा शहरातील शिवाजी महाराज चौक, मार्केट यार्ड, भाजी मंडई, कापड बाजार, सराफ बाजार, ग्रामपंचायत, मराठ गल्ली आदी भागातून निघाली. या फेरीत उपप्रचार्य जे.एम. भंडारी, डॉ. सुदाम आघाव, डॉ. विशाल वैद्य, डॉ.रावजी जगदाळे, डॉ. अमोल कल्याणकर, डॉ.धनश्री मुनोत, प्रा.बोंब, डॉ.किशोर कोईनकर, डॉ.तन्वीर काझी, प्रा.नवनाथ कराळे, प्रा.आशिष कटारिया, डॉ. राधाकृष्ण जोशी, डॉ. किशोर तळेकर, डॉ. जमीर सय्यद, डॉ. जाधवर, डॉ. हसे, प्रा.नरेंद्र गवळी, प्रा.मार्कंडे, प्रा.शिंदे, प्रा.भोसले व विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

## यांनीही घेतला पुढाकार

- संस्थेचे कांतीलाल चांदिया, गोकुळ मेहेर, हेमंत पोखरणा, अनिल झाडमुठा, महेंद्र पटवा, उमेश गांधी, संजय मेहेर यांनी ही सढळ हाताने मदत केली.
- यावेळी ३१ हजार १०० रुपयांचा निधी जमा झाला.

प्रयत्न झाला. त्यासाठी १९४४ मध्ये नांदेड येथे महिला कार्यकर्त्यांचे पहिले १५ दिवसांचे शिबीर घेण्यात आले. एस. आर. देशपांडे (एस.आर.गुरुजी) यांनी हे शिबीर संघटित केले होते. संपूर्ण मराठवाड्यातून २५ - ३० महिला यात सहभागी झाल्या होत्या. त्यानंतर

सकाळ TODAY
बुधवार, १३ मार्च २०१९ ३

# गांधी महाविद्यालयात तीनदिवसीय कार्यशाळा

**कडा, ता. १२ (बातमीदार)** : येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने तीनदिवसीय कार्यशाळा झाली.

रसायनशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र विषयाचे बीड जिल्ह्यातील ६९ विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पर्यावरण विभागप्रमुख आणि सीफर्डचे संचालक डॉ. एस. एस. पाटील, विज्ञान तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. मझहर फारुकी, डॉ. जयप्रकाश संगसेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अमोलक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे घेण्यात आलेल्या पावर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. डॉ. प. ल. जोशी स्मृतिप्रीत्यर्थ प्रा. डॉ. सुपर्णा देशमुख यांच्या वतीने देण्यात येणारे प्रथम पारितोषिक प्रियांका जाधवर हिने पटकावले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गाठी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गर्जे यांनी आभार मानले.

Jain Vidya Prasarak Mandal's ... Arts, Commerce & Science College, Kada ... LIBRARY

संबंध कायम ठेवला. महाराष्ट्र परिषदेच्या कार्याचा भाग म्हणून महिलांची संघटना बांधण्याचा प्रयत्न झाला. त्यासाठी १९४४ मध्ये नांदेड येथे महिला कार्यकर्त्यांचे पहिले १५ दिवसांचे शिबीर घेण्यात आले. एस. आर. देशपांडे (एस.आर.गुरुजी) यांनी हे शिबीर संघटित केले होते. संपूर्ण मराठवाड्यातून २५-३० महिला यात सहभागी झाल्या होत्या. त्यानंतर

कार्यक्रम • नायब तहसीलदार नीलिमा थेऊरकर यांचे गांधी महाविद्यालयात प्रतिपादन

# 'महिला धैर्याने संकटांचा सामना करतात'

प्रतिनिधी | आष्टी

महिलांनी दृढ निश्चिय होऊन,कठिण प्रसंगाला सामोरे जावे,महिला कोठेच कमी नाहीत,असे प्रतिपादन आष्टीच्या नायब तहसिलदार निलीमा थेऊरकर यांनी केले. कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारकच्या गांधी महाविद्यालयात आंतर राष्ट्रीय महिलादिनाच्या निमित्त त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रचार्य नंदकुमार राठी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कडा ग्रामपंचायतचे सरपंच दिपमाला अनिल ढोबळे ह्या होत्या. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य जवाहरलाल भंडारी, रणरागिणी संघटनेच्या आष्टी तालुकाध्यक्षा प्रा.मिरा नाथ, प्रा. धनश्री मुनोत, नवनाथ कराळे, अशिषकुमार कटारिया,हिरालाल लुणावत, अशोक खाडे यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.



आष्टी : कडा येथील कार्यक्रमात बोलताना नायब तहसीलदार थेऊरकर.

थेऊरकर म्हणाल्या,फक्त नोकरीत शिक्षणात नव्हे तर घरातही स्त्रीयांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे,स्त्री खुप यशस्वी होऊ शकते त्यासाठी पिता,पति,भाऊ यांनी तिला चांगल्या कामासाठी मागे न खेचता यशस्वी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी रणरागिनी संघटनेच्या तालुकाध्यक्ष प्रा.मिरा नाथ म्हणाल्या,आम्ही तालुक्यात रणरागिणी संघटनेच्या माध्यमातून महाविद्यालीय तरुणींना असलेल्या अडचणी सोडवित असून,त्यांना विविध स्पर्धोत्मक परिक्षेचे ज्ञान मिळविण्यासाठी मार्गदर्शन कॅम्पही आयोजित करत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी सुनिता बोंबे,सुवर्णा देशमुख,पदमा औताडे,जनाबाई पवळ,शिवराज पातळे,सुनिल पंढरे, सुदाम जाधव,रंजना जोशी,प्रियंका बोदार्डे यांच्यासह आदिनी सहकार्य केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.धनश्री मुनोत यांनी केले तर आभार नंदा राऊत यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

## विविध उपक्रम

महिला दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने आठवडाभर विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नायब तहसीलदार थेऊरकर यांनी स्पर्धा परिक्षेबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दै० झुंजारनेता दि. ७मार्च२०१

तनातून व उत्साही तरुणानी पारश्रम घेवून सप्ताहाचे आयोजनासाठी परिश्रम घेतले

# गांधी विद्यालयात विज्ञान दिनानिमित्त कार्यशाळेचे आयोजन

कडा( प्रतिनिधी ) – येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्ताने तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्ताने महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. रसायनशास्त्र आणि वनस्पती शास्त्र विषयाचे बीड जिल्ह्यातील ६९ विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पर्यावरण विभाग प्रमुख आणि सीफर्डचे संचालक डॉ एस एस पाटील, विज्ञान तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ मझहर फारुकी, डॉ जयप्रकाश संगसेट्टी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अमोलक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या पावर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कै डॉ प ल जोशी स्मृतिप्रीत्यर्थ प्रा डॉ सुपर्णा देशमुख यांच्या वतीने देण्यात येणारे प्रथम पारितोषिक प्रियंका जाधवर हिने पटकावले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एन एस राठी यांनी प्रास्ताविक केले.. सूत्रसंचालन डॉ देशमुख यांनी केले तर डॉ गर्जे यांनी आभार मानले.



जाहीर प्रगटन

Shri Amolak Jain Vidya Prasarak Mandal's Gandhi Arts, Commerce & Science College, Kada
LIBRARY

सकाळ | बीड
औरंगाबाद, गुरुवार, १९ मार्च २०२०

# TODAY

SakalNews | @esakalupdate | www.esakal.com | Call Center : 9225800800





कडा (ता. आष्टी) : येथील आरोग्य केंद्रात मार्गदर्शन करण्यात आले. (दुसऱ्या छायाचित्रात) महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर फलक लावण्यात आला.

# कडा येथे कोरोनाविषयी जनजागृती

**कडा, ता. १८ (बातमीदार) :** कडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने कडा आणि परिसरात सोमवारपासून (ता १६) कोरोनाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. कडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने कडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिराळ, डोंगरगण आणि शेरी बुद्रुक या गावामध्ये जाऊन जनजागृती करण्यात आली. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ नितीन मोरे, अनिल ढोबळे, मुख्याध्यापक टकले यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.तसेच श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयातील आपत्ती व्यवस्थापन विभागाद्वारे मंगळवारी (ता १७) कोरोना विषाणूविषयी कडा येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले.

प्राचार्य डॉ. एन. एस.राठी यांनी यावेळी उपस्थिताना मार्गदर्शन केले. या अभियानात प्राचार्य एन. एस. राठी, उपप्राचार्य जे. एम. भंडारी, आपत्ती व्यवस्थापनाच्या समन्वयक प्रा. मीरा नाथ, प्रा. नरेंद्र गवळी, प्रा. विशाल वैद्य, प्रा. तुकाराम गोंदकर, प्रा.किशोर तळेकर, प्रा.राधाकृष्ण जोशी, प्रा.अशोक आबदार, प्रा. योगेश रसाळ, प्रा.नवनाथ कर[illegible] प्रा.शिवाजी जगदाळे, प्रा.अ[illegible] कल्याणकर, प्रा.अरुणा कुल[illegible] प्रा.धनश्री मुनोत सहभागी झाले

# गांधी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । आष्टी



दि. १३ : अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी राजमाता जिजाऊ व सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एन. एस राठी हे होते. यावेळी प्रा. मिरा नाथ, नायब तहसिलदार शारदा दळवी, डॉ. मंजुश्री टेकाडे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात प्रा. मीरा नाथ म्हणाल्या की, महिलांमध्ये उत्तम व्यावसायिक व उद्योजकाचे गुण दडलेले असतात महिलांनी छोटे मोठे व्यवसाय थाटले पाहिजेत. महिलांनी आर्थिक सक्षम होऊन स्वत:ला सिद्ध करने ही काळाची गरज असल्याचे त्या म्हणाल्या. तर नायब तहसीलदार शारदा दळवी यांनी सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी समाजाची मानसिकता बदलवण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच हे काम केवळ स्त्रियाच करुशकतात, तेव्हा महाविद्यालयीन मुलिंनी जागृक राहून सामाजिक बदलाचा संकल्प केला पाहिजे असे सांगितले. तर डॉ. मंजुश्री टेकाडे यांनी मुलींनी प्रत्येक प्रसंगाला निर्भिडपने सामोरे जाऊन आपले शिक्षण अंध्यर्वर न सोडता उच्चपदस्थ होण्याचे आवाहन केले. तर प्राचार्य डॉ. एन. एस. राठी यांनी सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. खडतर परिश्रम आणि अढळ आत्मविश्वासाच्या बळावर अनेक अशक्य गोष्टी महिलांनी शक्य केल्या आहेत. यावेळी त्यांनी अनेक यशस्वी महिलांचे उदाहरण दिले. सूत्रसंचालन प्रा. धनश्री मुनोत यांनी केले. डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी मान्यवरांचा परिचय करुन दिला. तर आभार डॉ. अमोल कल्याणकर यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य जे.एम.भंडारी, प्रा. सुनिता बोंबे, डॉ. सुपर्णा देशमुख, डॉ. तनवीर काझी, प्रा. भाग्यश्री बोरा, प्रा. तेजश्री गोरे, प्रा. संगिता वाळके, अनिता टकले यांच्यासह सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती.

# झुंजार नेता

• दिनांक : १६ मार्च २०२० • वार: सोमवार • पान ३


## गांधी महाविद्यालयात पार पडला तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



आष्टी, दि.१५ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील कडा दि.१४ मार्च रोजी गांधी महाविद्यालयाच्यावतीने कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेत शिक्षण घेणाऱ्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.

या समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.नंदकुमार भंडारी, नॅक समितीचे समन्वयक प्रा.नरेंद्र गवळी , विद्यार्थी संसदेचे जनरल सेक्रेटरी (जी.एस.) किरण शिनगीरे हे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी कु. प्रियंका जाधवर हिने काव्यातून महाविद्यालया विषयीच्या भावना व्यक्त केल्या. कु.अंकित जाधव

▸▸पान २ वर

### गांधी महाविद्यालयात पार ......

महाविद्यालयाच्या विषयी आठवणी सांगताना या महाविद्यालयात आम्ही कसे घडलो आमच्यावर संस्कार कसे झाले. करिअरबाबत मार्गदर्शन कसे मिळाले. हे महाविद्यालय उपक्रमशील कसे आहे याविषयी तिने मनोगत व्यक्त केले. यानंतर उपप्राचार्य डॉ. ज.मो.भंडारी, प्रा. डॉ.सुपर्णा देशमुख, प्रा.डॉ. विशाल वैद्य यांनी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी म्हणाले, महाविद्यालयाने आपणास ज्ञानाची शिदोरी दिली आहे. आपल्या पंखात बळ भरविले आहे. आपण महाविद्यालयाशी पुढील काळात संपर्क ठेवा. आपले ऋणानुबंध दीर्घकाळ टिकून ठेवा. हे महाविद्यालय आपलेच आहे. चांगला अभ्यास करा उत्तुंग यश परीक्षेत मिळवा असा संदेश दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ढोबळे रेशमा, कु. कांचन थेटे व यशोदा भळगट तर विद्यार्थी प्रतिनिधी किरण शिनगीरे यांनी आभार मानले.

### साखरपुड्यात विवाह करून .......

करता, शाही विवाह सोहळ्यासाठीच्या फाजील खर्चाला फाटा देऊन

# कडा येथील गांधी महाविद्यालयात पार पडला तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

आष्टी (प्रतिनिधी):-आष्टी तालुक्यातील कडा दि. १४ मार्च रोजी गांधी महाविद्यालयाच्यावतीने कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेत शिक्षण घेणाऱ्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.

या समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.नंदकुमार भंडारी, नॅक समितीचे समन्वयक प्रा.नरेंद्र गवळी , विद्यार्थी संसदेचे जनरल सेक्रेटरी ( जी.एस.) किरण शिनगीरे हे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी कु. प्रियंका जाधवर हिने काव्यातून महाविद्यालया विषयीच्या भावना व्यक्त केल्या. कु.अंकित जाधव महाविद्यालयाच्या विषयी आठवणी सांगताना या महाविद्यालयात आम्ही कसे घडलो आमच्यावर संस्कार कसे झाले. करिअरबाबत मार्गदर्शन कसे मिळाले. हे महाविद्यालय उपक्रमशील कसे आहे याविषयी तिने मनोगत व्यक्त केले. यानंतर उपप्राचार्य डॉ. ज.मो.भंडारी, प्राः डॉ.सुपर्णा देशमुख, प्रा.डॉ. विशाल वैद्य यांनी शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी म्हणाले, महाविद्यालयाने आपणास ज्ञानाची शिदोरी दिली आहे. आपल्या पंखात बळ भरविले आहे. आपण महाविद्यालयाशी पुढील काळात संपर्क ठेवा. आपले ऋणानुबंध दीर्घकाळ टिकून ठेवा. हे महाविद्यालय आपलेच आहे. चांगला अभ्यास करा उत्तुंग यश परीक्षेत मिळवा असा संदेश दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ढोबळे रेशमा, कु. कांचन थेटे व यशोदा भळगट तर विद्यार्थी प्रतिनिधी किरण शिनगीरे यांनी आभार मानले.

सकाळ | बीड
औरंगाबाद, रविवार, १ मार्च २०२०
TODAY

## गांधी महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा

कडा, ता.२९ (बातमीदार) : आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयांमध्ये शुक्रवारी (ता २८) विज्ञान दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी हे होते.

यावेळी प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख, प्रा.नरेंद्र गवळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा.डॉ. योगेश रसाळ यांनी आजच्या काळातील संशोधनावर पीपीटी सादर केली. विद्यार्थ्यांमधून किरण भगवान शिनगिरे, अक्षय मुटकुळे, अभिषेक जठारे, यशोदा भळगट, अंकीता जाधव, ऋतिक धर्माधिकारी, सौरभ नागरे, प्रितेश भालेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा.डॉ.योगेश रसाळ यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.डॉ.सुदाम जाधव यांनी आभार मानले.

लोकमत
३ मार्च २०२०

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. ३ मार्च २०२०

## विज्ञान दिन साजरा

कडा : आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयामध्ये विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख, प्रा. नरेंद्र गवळी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. योगेश रसाळ यांनी पीपीटी सादर केली. विद्यार्थी अक्षय मुटकुळे, अभिषेक जठारे, यशोदा भळगट, अंकिता जाधव, ऋतिक धर्माधिकारी, सौरभ नागरे यांनी मनोगत व्यक्त केले.

... Jain Vidya Prasarak Mandal's Gandhi Arts, Commerce & Science College, Kada
LIBRARY

# आष्टी तालुक्यातील स्वच्छतागृहांची दुरवस्था

## अनेक शासकीय कार्यालयांत स्वच्छतागृहच नाहीत

**कडा, ता. २९ (बातमीदार)** : आष्टी तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय, निमशासकीय कामासंदर्भात आष्टी येथे यावे लागते; परंतु आष्टी येथील अनेक शासकीय कार्यालयांत महिलांसाठी स्वच्छतागृहच नाहीत. कडा, आष्टी येथील बसस्थानकात स्वच्छतागृहे उभारण्यात आली; मात्र अलीकडच्या काळात त्याकडे दुर्लक्ष केल्याने दुरवस्था झाली आहे. महाविद्यालयीन तरुणी; तसेच महिलांची मोठ्या प्रमाणात कुचंबणा होत आहे.

आष्टी तालुक्यातील सर्वच स्वच्छतागृहे तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी रणरागिणी संघटनेच्या अध्यक्षा मीरा नाथ यांनी बुधवारी (ता. २९) तहसीलदारांना निवेदनाद्वारे केली आहे. आष्टी तालुक्यातील कडा-आष्टी ही शहरे बाजारपेठेसोबतच शिक्षणाचे केंद्र असून, येथे शिक्षणासाठी परिसरातून येणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. दुपारी शाळा व महाविद्यालय सुटल्यानंतर परत गावी जाण्यासाठी अनेक विद्यार्थिनींना बसची वाट पाहत बसस्थानकात थांबावे लागते; मात्र कडा व आष्टी येथील बसस्थानकातील स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. पाणी साठविण्यासाठी बॅरल आहे; परंतु त्यामध्ये पाणीच नाही. या दुर्गंधीमुळे व अस्वच्छतेमुळे महिला व विद्यार्थिनी स्वच्छतागृहात जाण्याचे टाळतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ लागला आहे. अनेकवेळा रणरागिणी संघटनेने आगारप्रमुख व तहसील कार्यालयांना निवेदन दिले; परंतु सदरील निवेदनाची दखल अद्याप घेतली नाही. त्यामुळे महाविद्यालयीन तरुणी व विद्यार्थिनी; तसेच महिलांची कुचंबणा होत आहे. स्वच्छतागृह स्वच्छ करून पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी रणरागिणी संघटनेचे मीरा नाथ, सुमन खेडकर, पद्मजा औताडे, धनश्री मुनोत, मंगल टेकाडे, गायत्री जगताप, सीमा भवर, अरुणा कुलकर्णी, हेमाली बोडखे, सुनीता बोंबे, तनवीर काझी आदी महिलांनी आष्टीचे नायब तहसीलदार शारदा दळवी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



**आष्टी : स्वच्छतागृहाबाबत बुधवारी प्रशासनाला देण्यात आलेले निवेदन.**

लोकमत
हॅलो बीड
औरंगाबाद, शनिवार, दि.१० फेब्रुवारी २०२०

Shri Amolak Jain Vidya Prasarak Mandal's
Smt. S. K. Gandhi Arts, Commerce & Science College, Kada
LIBRARY

## गांधी महाविद्यालयात कायदेविषयक जागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

आष्टी : श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय कडा आणि राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ११ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी कायदेविषयक जागृती कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाचे अध्यक्ष कांतीलाल चनोदिया यांच्या अध्यक्षतेखाली आणि विश्वस्त अध्यक्ष गोकुलदास मेहेर यांच्या हस्ते डॉ. सुधा कांकरिया यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होणार आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार संबंधित कायद्यांची माहिती देण्यासाठी नगर येथील डॉ सुधा कांकरिया, अड. प्रशांत मोरे, अड.प्रजा हेंद्रे जोशी तसेच आष्टी येथील पोलीस उपअधीक्षक विजय लगारे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहे. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त महिलांनी, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. राठी व उपप्राचार्य डॉ. जे. एम. भंडारी यांनी केले आहे.

# झुंजार नेता

• दिनांक : १६ फेब्रुवारी २०२० • वार: रविवार • पान ३


## गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय कायदे विषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

कडा, दि.१५ ( प्रतिनिधी ):- आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालय व राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कायदे विषयक जन जागृती कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलक संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया तर व उद्घाटक म्हणून संस्थेचे गोकुलदास मेहेर हे होते. या कार्यक्रमाला डॉ. सुधा कांकरिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ॲड. प्रशांत मोरे, प्रज्ञा हेंद्रे तसेच आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. राठी म्हणाले की, महिलावरील अत्याचार थांबण्यासाठी समाजातील मनोवृत्ती, विचारात दृष्टिकोनात बदल होणे आवश्यक आहे. हे बदल चांगले संस्कार देण्याचे काम एक स्त्री व आईच करू शकते असे म्हणत मातेचे अनेक उदाहरणे दिले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने 'बेटी'च्या स्वागतासाठी प्राचार्य राठी यांनी एक रुपया देण्याचे सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना आवाहन करून सर्वानुमते तसा ठराव पास केला. यावेळी प्रशांत मोरे यांनी 'हुंडाबळी' व प्रज्ञा हेंद्रे (जोशी) यांनी 'महिलांचे होणारे मानसिक छळ' विषयी कायद्याची माहिती दिली. आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेले विविध कलम व माहिती देत विविध हेल्पलाईन नंबर ही दिले. महिलांवर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी समाजातील नागरिकांची मानसिकतेत बद्दल खूप गरजेचे आहे. स्त्रीवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव हेमंतकुमार पोखरणा, योगेशकु मार भंडारी, अनिलकु मार झाडमुथ्था, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, संचालक बाबूशेठ भंडारी, उपप्राचार्य जे एम भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. धनश्री मुनोत यांनी व उपस्थितांचे आभार प्रा.डॉ अनिल गर्जे यांनी मानले.

सकाळ | बीड
औरंगाबाद, बुधवार, १९ फेब्रुवारी २०२०
TODAY
SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800

LIBRARY



आष्टी : रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदन देताना महिला.

# रणरागिणी संघटनेतर्फे पोलिसांना निवेदन

**कडा, ता. १८ (बातमीदार)** : हिंगणघाट येथील प्रा. अंकितावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून लवकरात लवकर आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी आष्टी तालुका रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

एकीकडे महिला सबलीकरणाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे मुलींना जाळून मारायचे हे चित्र खूपच क्लेशदायी आहे. अलीकडेच हिंगणघाट तसेच औरंगाबादमध्ये अशा स्वरूपाच्या घृणास्पद घटना घडल्या; मात्र अशा घटना घडल्यानंतर आक्रोश करण्यापेक्षा अत्याचार थांबवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. महिलाविषयी मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. कठोर कायद्यांसह काही मूल्य संस्कार पुढच्या पिढीला देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सामुदायिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. म्हणूनच प्रबळ कायदा आणि जलद न्याय या माध्यमातून लोकांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न व्हायला हवा, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेच्या प्रा. मीरा नाथ, प्रा. डॉ. सुमन खेडकर, प्रा. पद्मजा औताडे, प्रा. धनश्री मुनोत प्रा. मंगला टेकाडे, प्रा. डॉ. गायत्री जगताप, श्रीमती मनीषा होळकर प्रा. डॉ. अरुणा कुलकर्णी, प्रा. हेमाली बोडखे, प्रा. जनाबाई पवळ, प्रा. डॉ. प्रमिला घुमरे, प्रा. शैलजा कुचेकर, प्रा. सुनीता बोंबे, श्रीमती नंदा राऊत, प्रा. डॉ. तन्वीर काझी आदींनी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

सकाळ

शनिवार, २२ फेब्रुवारी २०२०

LIBRARY

# अत्याचार रोखण्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीची गरज : कांकरिया

**सकाळ वृत्तसेवा**

नगर, ता. २० : "बदलत्या काळात आजची स्त्री समाजामध्ये कुठेच सुरक्षित नाही. दिवसेंदिवस अत्याचाराच्या घटनांत वाढ होत आहे. स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन 'बेटी बचाव'च्या राष्ट्रीय प्रणेत्या डॉ. सुधा कांकरिया यांनी केले.

आष्टी (जि. बीड) येथे अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय व राष्ट्रीय महिला आयोगातर्फे महिलांसाठी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम नुकताच पार पडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कांतिलाल चानोदिया, सचिव हेमंतकुमार पोखरणा, गोकुळदास मेहेर, योगेशकुमार भंडारी, डॉ. उमेश गांधी, जे. एम. भंडारी आदी उपस्थित होते. कांकरिया म्हणाल्या, "स्त्री-भ्रूणहत्येचे प्रमाण वाढत असल्याने मुलींच्या संख्येत घट होत आहे. स्त्री-पुरुषांमध्ये कायद्याविषयीची जागृती होणे गरजेचे आहे."

ॲड. प्रशांत मोरे यांनी हुंडाबळी व प्रज्ञा हेंद्रे यांनी महिलांच्या होणाऱ्या मानसिक छळाविषयी कायद्याची माहिती दिली. प्रास्ताविक प्राचार्य एन. एस. राठी यांनी केले. धनश्री मुनोत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अनिल गर्जे यांनी आभार मानले.




**आष्टी (जि. बीड) : महिलांसाठी आयोजित कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमात बोलताना 'बेटी बचाव'च्या राष्ट्रीय प्रणेत्या डॉ. सुधा कांकरिया.**

दै. सकाळ दि 21.2.2020

M Y K

# पार्श्वभूमी

शनिवार २९ फेब्रुवारी २०२०

...ain Vidhya Prasarak Mandal's ... LIBRARY ... Science College, Kada

## कडा येथील गांधी महाविद्यालयांमध्ये विज्ञानदिन साजरा

कडा (प्रतिनिधी)आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयांमध्ये विज्ञानदिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी हे होते. यावेळी बोलताना डॉ.राठी म्हणाले की, विज्ञानाची कास सर्वसामान्यांनी जोपासली पाहिजे तरच हे जीवन सुखी होईल. विज्ञानाचे आपल्या मानवी जीवनात अत्यंत फायदे आहेत परंतु विज्ञानाच्या दुरुपयोगाकडेही आपण अत्यंत जागरूक राहिले पाहिजे. आज व्हॉट्सप फेसबुकचा वापर पान २ वर

पान ६ वरून

## कडा येथील गांधी महाविद्यालयांमध्ये विज्ञानदिन साजरा

अति प्रमाणात वाढलेला आहे, त्याचा फक्त साधन म्हणून उपयोग केला पाहिजे. यावेळी त्यांनी सर्वांना राष्ट्रीय विज्ञानदिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमांमध्ये प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख, प्रा.नरेंद्र गवळी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा.डॉ. योगेश रसाळ यांनी आजच्या काळातील संशोधनावर पीपीटी सादर केली. विद्यार्थ्यांमधून किरण भगवान शिनगिरे, अक्षय मुटकुळे ,अभिषेक जठारे ,यशोदा भळगट , अंकीता जाधव जाधव , ऋतिक धर्माधिकारी , सौरभ नागरे, प्रितेश भालेकर यांनी मनोगते व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.योगेश रसाळ तर प्रा.डॉ.सुदाम जाधव यांनी आभार मानले.



कडा (ता. आष्टी) : चिन्मय पंडित यांचा सत्कार करण्यात आला.

## चिन्मय पंडित यांचा कड्यात सत्कार

**कडा :** आयएएस, आयपीएससारखे उच्चपदस्थ अधिकारी हे फक्त शहरी भागातूनही बनतात. ग्रामीण भागातील मुला-मुलींमध्येही ही क्षमता मोठ्या प्रमाणावर असते, असे प्रतिपादन नागपूरचे पोलिस उपायुक्त चिन्मय पंडित यांनी केले. चिन्मय पंडित हे मूळचे कडा येथील रहिवासी असून ते आष्टी तालुक्यातील पहिले आयपीएस उत्तीर्ण अधिकारी आहेत. मंगळवारी (ता. चार) त्यांनी कडा गावास भेट दिली. अमोलक शिक्षण संस्था, आनंदराव धोंडे महाविद्यालय, गांधी चॅरिटेबल ट्रस्ट आदी ठिकाणी त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा, उपसरपंच योगेश भंडारी, डॉ. उमेश गांधी, संजय मेहेर, बिपीन भंडारी, अजय चोरबेले, प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, प्राचार्य योगेश बाफना, प्रा. डॉ. जवाहर भंडारी, मुख्याध्यापक बी. जी. राऊत उपस्थित होते.

पार्श्वभूमी

दि. ५ फेब्रुवारी २०२०

# ग्रामीण भागातील मुलांमध्येही यशस्वी होण्याची क्षमता–पोलीस उपायुक्त चिन्मय पंडित



आष्टी (प्रतिनिधी):– उच्चपदस्थ अधिकारी केवळ शहरी भागातील मुलेच होऊ शकतात असे नाही तर ग्रामीण भागातील मुलामुलींमध्येही ही क्षमता असते असे प्रतिपादन नागपूर पोलीस उपायुक्त चिन्मय पंडित यांनी केले. नागपूरचे पोलीस उपायुक्त असलेले चिन्मय पंडित हे मूळचे कड्याचे रहिवासी आष्टी तालुक्यातील ते पहिले आयपीएस उत्तीर्ण अधिकारी. मंगळवारी त्यांनी कडा येथे भेट दिली . महेश मंदिर दर्शन सोहळा,अमोलक शिक्षण संस्था ,आनंदराव धोंडे महाविद्यालय ,गांधी चॅरिटेबल ट्रस्ट आदी ठिकाणी त्यांचा सत्कार करण्यात आला.अमोलक संस्थेत उपस्थितांशी संवाद साधताना ते म्हणाले की ,ग्रामीण भागातील युवक स्पर्धा परीक्षेची तयारी करताना केवळ पीएसआय ,एसटीसाय यासारख्या पदापर्यंत जाण्याचा प्रयत्न करतात . पण योग्य मार्गदर्शन मिळाले तर आयएएस ,आयपीए सारख्या परीक्षेत ही यश मिळवता येऊ शकते.स्पर्धा परीक्षेत ग्रामीण आणि शहरी असा काही भेदभाव नसतो.अंगी असलेल्या क्षमतेला योग्य मार्गदर्शन मिळाले तर यश नक्की मिळते .या भागातील युवकांच्या मार्गदर्धनासाठी मी नेहमी उपलब्ध असेल असे ही त्यांनी यावेळी सांगितले.आपल्या बालपणीच्या आठवणींना त्यांनी यावेळी उजाळा दिला.अमोलक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा ,कार्याध्यक्ष तथा उपसरपंच योगेश भंडारी ,डॉ.उमेश गांधी ,संजय मेहेर, बिपीन भंडारी, अजय चोरबेले ,प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी, प्राचार्य योगेश बाफना , प्रा.डॉ. जवाहर भंडारी ,मुख्याध्यापक बी.जी. राऊत , संपतदादा सांगळे , प्रा.शाम सांगळे ,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,रघुनाथ कर्डीले ,राजेश राऊत ,राजेंद्र तांगडे ,नितीन कांबळे ,संजय खंडागळे यांच्यासह इतर शिक्षक ,प्राध्यापक , ग्रामस्थ उपस्थित होते.

लोकमत
हॅलो बीड
औरंगाबाद, शुक्रवार, दि. १४ फेब्रुवारी २०२०

LIBRARY

**नागरिकांची मानसिकता बदलण्याचा सूर : स्त्री अत्याचार रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन**

# गांधी महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

कडा : आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात गांधी महाविद्यालय व राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कायदे विषयक जन जागृती कार्यक्रम मंगळवारी संपन्न झाला.



कडा येथील गांधी विद्यालयात कायदेविषक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. सुधा कांकरिया, वकील प्रशांत मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, डॉ. एन. एस. राठी, हेमंतकुमार पोखरणा, डॉ. उमेश गांधी आदी

- कार्यक्रमाच्या अनुषंगाने 'बेटी च्या स्वागतासाठी प्राचार्य राठी यांनी एक रुपया देण्याचे सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना आवाहन करून सवार्नुमते तसा ठराव पास केला.
- वकील प्रशांत मोरे यांनी 'हुंडाबळी' व प्रज्ञा हेंद्रे यांनी 'महिलांचे होणारे मानसिक छळ' विषयी कायद्याची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया, उद्‌घाटक म्हणून संस्थेचे गोकुलदास मेहेर हे होते. या कार्यक्रमाला डॉ. सुधा कांकरिया, तर प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर येथील वकील प्रशांत मोरे, प्रज्ञा हेंद्रे (जोशी) तसेच आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एन. एस. राठी म्हणाले की, महिलांवरील अत्याचार थांबण्यासाठी समाजातील मनोवृत्ती, विचारात दृष्टिकोनात बदल होणे आवश्यक आहे. हे बदल चांगले संस्कार देण्याचे काम एक स्त्री व आईच करू शकते असे म्हणत मातांची अनेक उदाहरण दिले.

विजय लगारे म्हणाले, महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेले विविध कलम व माहिती देत विविध हेल्पलाईन नंबर ही दिले. महिलांवर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी समाजातील नागरिकांची मानसिकतेत बद्दल खूप गरजेचे आहे. स्त्रीवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाला संस्थेचे सचिव हेमंतकुमार पोखरणा, योगेशकुमार भंडारी, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, संचालक बाबूशेठ भंडारी, उपप्राचार्य जे. एम. भंडारी हे उपस्थित होते. प्रा. ए. पी. कटारिया, प्रा. डॉ. एस. आर. मगर, प्रा. एन. टी. गवळी, संयोजक प्रा. धनश्री मुनोत, सह संयोजक प्रा. डॉ. अरुणा कुलकर्णी, प्रा. डॉ. संदीप काझी, अनिता टकले आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनश्री मुनोत, आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अनिल गर्जे यांनी केले.

लोकमत

# हॅलो बीड

औरंगाबाद, शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२०

सकाळ बीड
TODAY
f SakalNews | eSakalUpdate | www.esakal.com



आष्टी : रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदन देताना [illegible]

# रणरागिणी संघटनेतर्फे पोलिसांना निवेदन

**कडा, ता. १८ (बातमीदार)** : हिंगणघाट येथील प्रा. अंकितावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून लवकरात लवकर आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी आष्टी तालुका रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

एकीकडे महिला सबलीकरणाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे मुलींना जाळून मारायचे हे चित्र खूपच क्लेशदायी आहे. अलीकडेच हिंगणघाट तसेच औरंगाबादमध्ये अशा स्वरूपाच्या घृणास्पद घटना घडल्या; मात्र अशा घटना घडल्यानंतर आक्रोश करण्यापेक्षा अत्याचार थांबवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. महिलांविषयी मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. कठोर कायद्यांसह काही मूल्य संस्कार पुढच्या पिढीला देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सामुदायिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. म्हणूनच प्रबळ कायदा आणि जलद न्याय या माध्यमातून लोकांना [illegible] प्रयत्न [illegible] म्हटले आहे. [illegible] मीरा [illegible] प्रा. [illegible] प्रा. [illegible] जगताप, [illegible] डॉ. [illegible] बोडखे, प्रा. [illegible] प्रमिला पुरी [illegible] सुनीता [illegible] डॉ. [illegible] निवेदनाद्वारे [illegible]

सकाळ | बीड
औरंगाबाद, बुधवार, १९ फेब्रुवारी २०२०
TODAY
SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800

LIBRARY



आष्टी : रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदन देताना महिला.

# रणरागिणी संघटनेतर्फे पोलिसांना निवेदन

**कडा, ता. १८ (बातमीदार)** : हिंगणघाट येथील प्रा. अंकितावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून लवकरात लवकर आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी आष्टी तालुका रणरागिणी महिला संघटनेच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी विजय लगारे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

एकीकडे महिला सबलीकरणाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे मुलींना जाळून मारायचे हे चित्र खूपच क्लेशदायी आहे. अलीकडेच हिंगणघाट तसेच औरंगाबादमध्ये अशा स्वरूपाच्या घृणास्पद घटना घडल्या; मात्र अशा घटना घडल्यानंतर आक्रोश करण्यापेक्षा अत्याचार थांबवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. महिलाविषयी मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. कठोर कायद्यांसह काही मूल्य संस्कार पुढच्या पिढीला देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सामुदायिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. म्हणूनच प्रबळ कायदा आणि जलद न्याय या माध्यमातून लोकांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न व्हायला हवा, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेच्या प्रा. मीरा नाथ, प्रा. डॉ. सुमन खेडकर, प्रा. पद्मजा औताडे, प्रा. धनश्री मुनोत प्रा. मंगला टेकाडे, प्रा. डॉ. गायत्री जगताप, श्रीमती मनीषा होळकर प्रा. डॉ. अरुणा कुलकर्णी, प्रा. हेमाली बोडखे, प्रा. जनाबाई पवळ, प्रा. डॉ. प्रमिला घुमरे, प्रा. शैलजा कुचेकर, प्रा. सुनीता बोंबे, श्रीमती नंदा राऊत, प्रा. डॉ. तन्वीर काझी आदीनी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत गांधी महाविद्यालयाचे सुयश

कडा, दि.१४ (लोकाशा न्युज):-येथील गांधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इन्स्टिटयूट ऑफ बीजनेस मॅनेजमेंट आणि रुरल डेव्हलपमेंट विखे पाटील महाविद्यालय विळदघाट येथे पार पडलेल्या स्पंदन मॅक्स, २०२० आंतरमहाविद्यालयीन घवघवीत यश मिळवले.



या स्पर्धेत महाविद्यालयातील अंकिता जाधव, रेश्मा शेकडे व प्रियांका जाधवर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तर अॅडमॅडशो या स्पर्धेत भालेकर प्रितेश, आमटे विशाल, धर्माधिकारी ऋतिक, नांगरे सौरभ, हारकर अतुल, शेळके उत्तरेश्वर, मुटकूळे अक्षय यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. फॅशन-शो स्पर्धेत उत्तरेश्वर शेळके यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. संघाचे प्रमुख म्हणून प्रा. अनिल गर्जे, हिरालाल लुनावत आदींचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विजेत्यांचे अमोलक जैन संस्थेचे पदाधिकारी प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी कौतुक केले.

लोकमत

हॅलो बीड

औरंगाबाद, शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२०

# रासेयोतून समाजसेवेची संधी - जयदत धस

लोकमत न्यूज नेटवर्क



आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी कॉलेजचे रासेयो शिबीर वटणवाडी येथे सुरू आहे. शिबिरात जयदत्त धस यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवर आदी.

आष्टी : तालुक्यातील वटणवाडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय, कडा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या जलसाक्षरता व जलसंवर्धनासाठी युवा या विशेष हिवाळी शिबिराचे २३ जानेवारी रोजी उद्घाटन झाले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चाणोदिया हे होते. उद्घाटक म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते जयदत्त धस हे होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना बीडचे समन्वयक डॉ. सोपानराव सुरवसे हे होते.

प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ विधाते, सूत्रसंचालन डॉ. अनिल गर्जे यांनी केले तर आभार डॉ. सुपर्णा देशमुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्या डॉ. भंडारी, प्रा. डॉ. अनारसे, डॉ. उध्दव चव्हाण, प्रा. सय्यद युनूस, टकले, मुकुंद बेल्हेकर, हिरालाल लुनावत यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी पं. स. सदस्य अशोक मुळे, सरपंच छगनराव शिनगिरे, भगवान शिनगिरे, उपसरपंच दामोधर कोकाटे, ग्रामविकास अधिकारी औंदकर, माजी सरपंच आत्माराम मुळे, मुख्याध्यापिका सुवर्णा भोरे, मारुती शिनगीरे उपस्थित होते.

दै. [illegible]
दि. 3/9/2020

# कड्यात चानोदिया, कांबळे यांचा सत्कार



**कडा** | येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी कांतीलाल चानोदिया यांची फेरनिवड झाली. यासह पत्रकार नितीन कांबळे यांना आष्टी येथील गंगाई- बाबाजी पुरस्कार जाहीर झाला. या दोघांचाही सत्कार करताना पत्रकार राजेश राऊत, रघुनाथ कर्डिले, संजय खंडागळे, सुनील आढाव, डॉ. विष्णू साबळे, डॉ.अरुण तुराळे आदी.

पुण्य नगरी
गुरुवार,२३ जानेवारी २०२०

LIBRARY

# गांधी महाविद्यालयाचे 'रासेयो' शिबिराचे आयोजन

**आष्टी / प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या वतीने वटणवाडी येथे दि.२३ जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कांतीलालजी चाणोदिया तर उद्घाटक म्हणून विश्वस्त अध्यक्ष गोकुळदास मेहेर आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. सोपानराव सुरवसे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उध्दवराव दरेकर, जि.प. सदस्य नीता शिंदे, जयदत्त धस, संग्राम आजबे, अजय धोंडे, हेमंतकुमार पोखरणा आदी उपस्थित राहणार आहेत. या शिबिरात ग्राम स्वच्छता, जलसंधारणाचे महत्त्व या विषयांवर जनजागृतीपर व्याख्याने आयोजित केली, तसेच दि. २४ जानेवारी रोजी कविसंमेलन होणार आहे. याप्रसंगी ग्रामस्थ यांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी व प्रा. नवनाथ विधाते यांनी केले.